सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व पंचायत राज विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.org

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४



किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन, पुणे येथे मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ च्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मान



किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन, पुणे येथे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ च्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मान




किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन, पुणे येथे मंचावर उपस्थित भारत सरकारचे मा. मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग व इतर मान्यवर




किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन प्रसंगी पुणे येथे मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना घरकुल स्टॉलवर माहिती देतांना मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य डॉ.राजाराम दिघे

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे<br>संचालक,<br>ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>सुनिल मोरे, सहा. संचालक (लेखा)<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष ५ वे । अंक १८ वा । ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४

## अनुक्रमणिका


| अं.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन | ३ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ६ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १४ |
| | समन्वय उपक्रम | १६ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | १९ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ | २० |
| | प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ | २१ |
| | रमाई आवास योजना | २२ |
| | शबरी आवास योजना | २३ |
| | पारधी आवास योजना | २४ |
| | आदिम आवास योजना | २५ |
| | प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान | २५ |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना | २६ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २६ |
| | मोदी आवास घरकुल योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य**

माहे आक्टोबर ते डिसेंबर २०२४ या सरत्या वर्षाच्या शेवटच्या अंकाच्या माध्यमातून आपणांसोबत संवाद साधताना मला आनंद होत आहे. सरत्या वर्षामध्ये राज्यामध्ये विधानसभा निवडणूकांमध्ये आपण सर्व व्यस्त असतानाही ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाकडे आपण दिलेल्या लक्षामुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून लाखो लोकांना हक्काचा निवारा उपलब्ध झाला आहे. त्याचबरोबर हजारो भूमिहीन लाभार्थ्यांना शासनाच्या वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून जागा उपलब्ध करून झाली आहे. याबद्दल विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावरील माझ्या सर्व सहकार्यांचे मी अभिनंदन करतो.

मागील वर्षामध्ये आपण 'महा आवास अभियान २०२३-२४' मध्ये घरकुल बांधकामासोबत अनेक नाविन्यपुर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केली. याचा फायदा लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यामध्ये होत आहे. असे असले तरी राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांमधील भूमिहीन लाभार्थी, प्रलंबित मंजूरी, अपुर्ण घरकुले पुर्ण करण्याचे मोठे उद्दिष्ट शिल्लक आहे. ही कामे गतिमान पद्धतीसोबत गुणवत्तापुर्ण होण्यासाठी तसेच लाभार्थ्यांना मुलभूत नागरी सुविधा देणे, नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे व विविध शासकीय योजनांचा कृतीसंगम करणे बरोबरच योजनांमधील सर्व भागधारकांच्या क्षमताबांधणीसाठी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज तसेच मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या संकल्पनेतून १०० दिवसीय 'महा आवास अभियान' दिनांक १ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या कालावधीत राबविण्याचा व त्याला मूर्त स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे डिसेंबर २०२४ मध्ये १०० दिवसीय कार्यक्रमाची घोषणा केली असून यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनांचाही १०० दिवसीय कार्यक्रम दिला आहे. त्यानुसार राज्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत १०० दिवसीय 'महाआवास अभियान' दिनांक १ जानेवारी २०२५ ते १० एप्रिल २०२५ या कालावधीत राबविण्याचे प्रस्तावित आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसीय कार्यक्रमांर्तगत १) किमान १३ लाख घरकुलांना मंजूरी देणे, २) किमान ३ लाख घरकुल मंजूर लाभार्थ्यांना पहिला हप्ता म्हणून एकूण रु.४५० कोटी वितरीत करणे, ३) किमान १ लाख घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे, ४) किमान ५००० लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देणे, ५) ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी, गतीमान, दर्जेदार अंमलबजावणी व लोकसहभागासाठी 'महा आवास अभियान २०२४-२५' राबविणे हे उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत.

१०० दिवसीय कार्यक्रमामध्ये ५ वा उपक्रम 'महा आवास अभियान' राबविणे असून या १०० दिवसांच्या कालावधीत विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. जसे की, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, उर्वरीत घरकुलांना मंजूरी देणे, मंजूर घरकुलांना सर्व हप्त्यांचे वितरण करणे, घरकुले भौतिकदृष्ट्या पुर्ण करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे, प्रलंबित घरकुले पुर्ण करणे, सामाजिक अंकेक्षण करणे, Area Officer App चा वापर करणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा कृतीसंगम करणे. बरोबरच नाविन्यपुर्ण उपक्रमांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. या अभियानातही आपण हिरीरीने भाग घेऊन आपल्या जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतीस पुरस्कार प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील राहाल ही

अपेक्षा.

दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी किसान सम्मान दिवस : किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन कार्यक्रम आई.सी.ए.आर. अटारी, पुणे येथे पार पडला. या कार्यक्रमामध्ये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग हे उपस्थित होते. तर भारत सरकारचे मा. मंत्री, ग्रामीण विकास व कृषी एंव किसान मंत्रालय श्री. शिवराज सिंह चौहान हे उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रासाठी आवास प्लस मधील १३,२९,६७८ इतक्या उद्दिष्टाची घोषणा श्री.शिवराजसिंह चौहाण यांनी केली. तसे पत्र त्यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे. त्यामुळे सन २०२४-२५ मध्ये राज्यास प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत एकुण १९,६६,७६७ इतके उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत प्राप्त झालेले ३३ हजारपेक्षा अधिकचे उद्दिष्ट एकत्रित केले तर या वर्षामध्ये २० लाखापेक्षा अधिक उद्दिष्ट केंद्र सरकारकडून प्राप्त झाले आहे. यापैकी माहे सप्टेंबर २०२४ मध्ये प्राप्त झालेले ६,३७,०८९ उद्दिष्टापैकी आपण ५,९१,२०२ लाभार्थ्यांच्या म्हणजेच ९३% मंजूरीची प्रक्रिया पुर्ण केल्याबद्दल आपले अभिनंदन. नव्याने प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने आपणास लाभार्थ्यांच्या नोंदणीची प्रक्रिया विहित वेळेत पुर्ण करणे आवश्यक असून उद्दिष्ट प्राप्त होताच तात्काळ मंजूरीची प्रक्रिया पुर्ण करावी लागेल. कारण मंजूरी देणे हा मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसीय कार्यक्रमाचा प्रमुख मुद्दा आहे.

दरम्यानच्या काळामध्ये मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकांचे वृत्तांकन करण्यात आले आहे. तसेच मी स्वतः ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या आढावा बैठका घेवून या माध्यमातून गतिप्राप्त करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

ग्रामविकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दरम्यानच्या काळामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील अपुर्ण घरकुले पुर्ण करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू केला. प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीण टप्पा-१ मधील उर्वरीत घरकुलांचे **अ**, **ब** व **क** असे वर्गीकरण करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने आपण आपल्या स्तरावरून या घरकुलांना प्रत्यक्ष भेटी देऊन घरकुले सुरू करण्याबाबत व पुर्ण करण्याबाबत पाठपुरावा सुरू केल्यामुळे यामध्ये पुढील काळात नक्कीच बदल दिसून येईल याची मला खात्री आहे. याचाच भाग म्हणून मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी विविध जिल्ह्यांमध्ये घरकुलांना भेटी दिल्याचेही वृत्तांकन करण्यात आले आहे. तसेच राज्यातील कोल्हापूर, रायगड, सातारा, पुणे, जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांमार्फत घरकुले पुर्ण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या नाविन्यपुर्ण बाबींचाही समावेश या अंकामध्ये करण्यात आला आहे. दिनांक २५ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान अपुर्ण घरकुले पुर्ण करण्यासाठी सर्व विभागांमध्ये मोहिमांचे आयोजन करण्यात आले होते. याचाही फायदा घरकुले पुर्ण करण्यामध्ये झाला याचा मला आनंद आहे.

राज्यामध्ये रमाई, शबरी, आदीम, पारधी, अटल बांधकाम कामगार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत व मोदी आवास घरकुल योजना या योजनांमध्येही अद्याप ३ लाखापेक्षा जास्त मंजूरी प्रलंबित असून आपणास या मंजूरीच्या प्रक्रियेमध्ये गती प्राप्त करणे आवश्यक आहे. आपण ग्रामीण गृहनिर्माणच्या १०० दिवसीय कार्यक्रमामध्ये मोलाचे योगदान देऊन सर्व उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसह नक्कीच यशस्वी होऊ. याची मला खात्री आहे.

या अकांमध्ये मागील अंकाप्रमाणे यशोगाथा, मुख्य कार्यकारी अधिकारी, स्थानिक अधिकारी पदाधिकारी यांच्या बैठका, क्षेत्रीय भेटी, राज्यस्तरावरून राबविण्यात आलेल्या मोहिमा, सर्व योजनांचा संचित प्रगती अहवाल तसेच विभागनिहाय यशोगाथा यांचा समावेश करण्यात आला आहे. मागील अंकाप्रमाणे हा अंकही आपणास नक्की आवडेल या अपेक्षेसह व अनेक शुभेच्छांसह!

डॉ. राजाराम दिघे
संचालक, ग्रामीण गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य

# किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन

# PMAYG-2 मधून राज्याला 13.29 लक्ष घरांची भेट



मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस व मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य श्री. चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी २.०० वा. आई.सी.ए.आर.-अटारी, पुणे येथे किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन संपन्न झाले.

या कार्यक्रमाकरीता सहसंचालक (ग्रामीण गृहनिर्माण), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.आशिष शिंदे व राज्यस्तरावरून मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे, उपसंचालक श्री.नीलेश काळे, राज्य समन्वयक (M&E) श्री.संघरत्न सोनवणे, राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ श्री.दिनेश मोवळे यांच्यासह उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री.विजय मुळीक, जिल्हाधिकारी पुणे श्री.विलास पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पुणे, प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू व इतर संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.




या कार्यक्रमाकरीता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुले पूर्ण केलेले लाभार्थी उपस्थित होते. यापैकी काही लाभार्थ्यांना मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन व मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मानित करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुले पूर्ण झालेल्या काही लाभार्थ्यांनी प्रातिनिधीक स्वरूपात मनोगत व्यक्त केले.

या सम्मेलन प्रसंगी मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र राज्यासाठी १३,२९,६७८ घरांचे अतिरिक्त लक्ष्य मंजूरीची घोषणा केली. तसेच याबाबतचे पत्रही मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांना दिले.

सम्मेलन कार्यक्रम स्थळी प्रदर्शनीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनासंबंधित स्टॉल लावण्यात आला होता.



# देशातील कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याला सर्वाधिक घरे देणार

**- मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान**



किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन कार्यक्रमाप्रसंगी मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले की, माझा महाराष्ट्राशी निकटचा संबंध असून मी महाराष्ट्राचा जावई आहे. त्यासोबतच ग्राम विकास मंत्री देखील आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी १९ लाख ६६ हजार घरे यावर्षी देण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी मा. केंद्रीय मंत्री महोदयांनी केली. देशातील कोणत्याही राज्यापेक्षा ही संख्या जास्त असून आजपर्यंत एका राज्याला एका वर्षात मिळालेली ही सर्वाधिक घरे असल्याचे मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले

तुम्हाला माहिती आहे की, ग्रामीण विकास मंत्रालयाने "सर्वांसाठी घरे" या उद्देशाने दिनांक १ एप्रिल २०१६ पासून भारत सरकारची प्रमुख योजना म्हणून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) लागू केली. देशातील ग्रामीण भागात मुलभूत नागरी सुविधांसह पक्के घरे बांधण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना मदत करणे हा या योजनेचा उद्दिष्ट असल्याचे मा.मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी सांगितले.

मला तुम्हाला कळवण्यास आनंद होत आहे की, भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये तुमच्या राज्यासाठी १३,२९,६७८ घरांचे अतिरिक्त लक्ष्य मंजूर केले. त्यानुसार तुमच्या राज्यासाठी आर्थिक वर्ष २०२४-२५ चे एकत्रित लक्ष्य १९,६६,७६७ घरे असणार असल्याचे मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले.

# महाराष्ट्र राज्यात कोणताही जातसमुह घरकुलापासून वंचित राहणार नाही

**- मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस**

किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन कार्यक्रमाप्रसंगी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्यास प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आतापर्यंत १९,४५,०९० उद्दिष्ट प्राप्त झाले असून आतापर्यंत १२,६२,५४० घरकुले पुर्ण झाली आहेत. तसेच ६ लक्ष ८२ हजार घरकुले पुर्णत्वाच्या विविध टप्प्यावर आहेत. राज्यासाठी १३,२९,६७८ घरांचे अतिरिक्त लक्ष्य मंजूर केले यासाठी मा. प्रधानमंत्री श्री.मोदीजी आणि मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांचे महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने मा.मुख्यमंत्री महोदयांनी आभार मानले.

मला हे सांगताना आनंद होत आहे की, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण बरोबरच राज्यामध्ये अनेक मागास जाती, जनजाती, भटक्या विमुक्त जातींसाठी राज्यपुरस्कृत रमाई आवास, शबरी आवास, पारधी आवास, आदिम आवास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी आवास, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना आणि मोदी आवास घरकुल योजना राबविण्यात येतात. यामुळे अनेक मागास जातींना याचा फायदा झाला असून यामुळे कोणताही जातसमुह घरकुलापासून वंचित राहत नसल्याचे मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जागा उपलब्ध करून देण्यामध्ये महाराष्ट्र राज्य देशामध्ये प्रथम क्रमांकावर आहे. यासाठी आमच्या सरकारने अनेक योजना तयार केल्या असून यामध्ये पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनाही आहे. या योजनेअंतर्गत देण्यात येणारी अनुदानाची रक्कम रू. ५० हजार वरून रु.१ लक्ष करण्यात आली असल्याचे मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारने दिनांक २० नोव्हेंबर या आवास दिनाचे औचित्य साधून दरवर्षी महा आवास अभियान राबविण्यात येते. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम जसे **बहुमजली इमारती**, **गृहसंकुले**, **बहुमजली गृहसंकुले**, **लॅंड बॅंक**, **सॅंड बॅंक**, **घरकूल मार्ट**, **आदर्श घरकूले**, **मुलभूत सुविधायुक्त घरकूले**, लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध **शासकीय योजनांशी कृतीसंगम** इत्यादि उपक्रम राबविण्यात आले आहेत. याची दखल केंद्रीय ग्राम विकास मंत्रालयानेही घेतली असल्याचे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



## मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांचे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्र राज्याला प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत अतिरिक्त उद्दिष्ट मंजूर केलेबाबतचे पत्र

शिवराज सिंह चौहान
SHIVRAJ SINGH CHOUHAN

कृषि एंव किसान कल्याण और
ग्रामीण विकास मंत्री
भारत सरकार
कृषि भवन, नई दिल्ली

Minister of Agriculture & Farmers Welfare
and Rural Development
Government of India
Krishi Bhawan, New Delhi

D.O. no. J-11018/2/2023-RH-Pol. (e-385885)

December, 2024

Respected **Shri Devendra Fadnavis ji,**

As you are aware, the Ministry of Rural Development is implementing the Pradhan Mantri Awaas Yojana- Gramin (PMAY-G), a flagship scheme of the Government of India with effect from 1st April, 2016 with the objective of "Housing for All" in rural areas of the country. The scheme aims to provide assistance to eligible rural households for the construction of *Pucca*houses with basic amenities. The Union Cabinet in its meeting held on 9th August, 2024 has approved the continuation of the scheme for 5 more years till March, 2029 for construction of 2 crore additional houses to meet the arising housing requirements in rural areas. A target of 6,37,089 houses was allocated to your State during FY 2024-25 from the finalised Awaas+ 2018 survey lists of the PMAY-G.

2. In this connection, I am delighted to inform you that the Ministry of Rural Development, Government of India has approved additional target of **13,29,678 houses** for your State during FY 2024-25 under the Pradhan Mantri Awaas Yojana- Gramin from the finalised Awaas+ 2018 survey lists. This is a step towards the commitment of the Government of India for "Housing for All" in rural areas of the country. The cumulative target for FY 2024-25 to your State would accordingly be **19,66,767 houses.**

3. I would like to take this opportunity to reiterate the commitment of this Ministry towards the successful implementation of the PMAY-G in your State.

With regards,

Yours sincerely,

(Shivraj Singh Chouhan)

**Shri Devendra Fadnavis,**
Hon'ble Chief Minister,
State Government of Maharashtra,
Chief Minister's Office,
Mumbai, Maharashtra

Delhi Office - Agriculture & Farmer's Welfare Minister's Office : 120, Krishi Bhawan, New Delhi-110001
Tel.: 011-23383370, 23782594, 23073789, 23782691
Rural Development Minister's Office : 'G' Wing, Ground Floor, Krishi Bhawan, New Delhi-110001
Tel. : 011-23383548, 23782373, 23782327, Fax : 011-23070309
Bhopal Office : B-8, 74 Bungalow, Swami Dayanand Nagar, Link Road, No. 1, Bhopal-462003
Tel. : 0755-2545678, 2565678, 2991050, 2991339

## मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १०० दिवसांच्या विशेष कार्यक्रमांचा आढावा बैठक

दिनांक ३० डिसेंबर,२०२४ रोजी सह्याद्री अतिथी गृह, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १०० दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत सर्व विभागांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास विभागातील सर्व योजनांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीला मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्यासह मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले व संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे तसेच सर्व विभागांचे मा.मंत्री व सचिव उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे यांनी पुढील १०० दिवसांमध्ये ग्राम विकास विभागाकडून राबविण्यात येणारे उपक्रम, योजना, धोरणे आणि कार्यक्रमांची योजनानिहाय माहिती दिली. तसेच ग्राम विकास विभगाच्या पुढील १०० दिवसांत होणारी विकासकामे, उपक्रम आणि धोरणांच्या योजना याबाबतचे सादरीकरण मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी केले.

सर्व विभागांनी त्यांच्या सबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सुचना व यासंदर्भात आवश्यक मार्गदर्शन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीमध्ये केले.





## मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या अध्यक्षतेखाली सर्व खातेप्रमुखांची बैठक

दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास व पंचायत राज विभागांतर्गत विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी सर्व खातेप्रमुखांची बैठक बांधकाम भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

या बैठकीला सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांसंबंधित माहिती देण्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ.राजाराम दिघे उपस्थित होते. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सचिव, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना मुख्य अभियंता पुणे, संचालक (पंचायत राज) पुणे यांच्यासह अन्य विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

याबैठकीमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या सबंधित योजनांची सविस्तर माहिती सादरीकरणासह दिली. यावेळी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची भूमिका व जबाबदारी तसेच या कार्यालयामार्फत राबविण्यात येणारे उपक्रम, योजना व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राबविण्यात येणारे महा आवास अभियान व या अभियानाच्या माध्यमातून राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम जसे **बहुमजली इमारती**, **गृहसंकुले**, **बहुमजली गृहसंकुले**, **लँड बँक**, **सँड बँक**, **घरकूल मार्ट**, **आदर्श घरकूले**, **मुलभूत सुविधायुक्त घरकूले**, विविध **शासकीय योजनांशी कृतीसंगम**, इ. बाबतची माहिती ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ.राजाराम दिघे यांनी दिली.






# घरकुल योजनांना बळकटी देण्याचा मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांचा संकल्प

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.जयकुमार गोरे यांचेवर ग्राम विकासाची अत्यंत महत्वाची जबाबदारी दिली आहे. मा.मंत्री महोदयांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी मंत्रालयातील मुख्य प्रवेशद्वाराजवळील महापुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन करून राज्याच्या ग्राम विकास व पंचायत राज मंत्रीपदाचा पदभार घेतला.

येणाऱ्या काळात ग्रामीण भागातील मूलभूत सोयी सुविधा सुधारण्यावर भर देणार आहे. तसेच देशाचा व राज्याचा ध्वजांकीत कार्यक्रम घरकुल योजना असल्याने सर्व घरकुल योजनांना बळकटी देण्याच्या मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार गरिबांना घरकुल मिळण्यासाठी १०० दिवसात २० लाख घरकुलांना मान्यता देण्याचा संकल्प आज करत असल्याचे मा.मंत्री महोदयांनी पदभार स्विकारल्यावर सांगितले.

ग्रामीण भागात काम करण्याची संधी मिळाल्याने मंत्रीपदाच्या माध्यमातून मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी व मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पना राबवून खात्याचे नाव उंचावणार आहे. १०० दिवसांचा कार्यक्रम समोर ठेवून काम करणार असून प्रथमच राज्याला २० लाख घरांचे उद्दिष्ट मिळाले आहे. १०० दिवसात या घरांना मान्यता देवून काम चालू करणार असल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.जयकुमार गोरे यांनी सांगितले.





# मा. उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ व २ ची आढावा बैठक संपन्न

मा.उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, श्री. गया प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ व २ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला महाराष्ट्र राज्याच्या वतीने राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ.राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत देशामध्ये महाराष्ट्र राज्यास सर्वाधिक ६,३७,०८९ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून त्यापैकी ५,५७,१०७ लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र राज्याची कामगिरी देशात सर्वोत्कृष्ट असल्याबाबत केंद्र शासनाने समाधान व्यक्त केले असल्याचे मा.उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय श्री.गया प्रसाद यांनी सांगितले.

परंतु प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ अंतर्गत एकूण १३,६२,०२३ घरकुल उद्दिष्टापैकी १२,५६,१८९ घरकुले पूर्ण केली असून अद्यापही १,०५,८३४ घरकुले अपूर्ण असल्याबाबत नाराजीही व्यक्त केली. ही अपूर्ण घरकुले दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना मा.उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, श्री. गया प्रसाद यांनी दिल्या.

त्यानुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ व सर्व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, अशी सर्व घरकुले online पूर्ण करणे. Plinth व Lintel Level वरील घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे. प्रलंबित घरकुले पूर्ण करणे. आधार सिडींग, Authentication व आधार Verification पूर्ण करणे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ पहिला हप्ता वितरण करणे. अशा सुचना मा.उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, श्री. गया प्रसाद यांनी दिल्या.



## मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या जिल्ह्यांना क्षेत्रीय भेटी

मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी ग्राम विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या प्रभावी अंमलबजाणी व सर्व यंत्रणेच्या क्षमता बांधणीसाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड व परभणी जिल्ह्यांचा दौरा केला.

दिनांक २४ ऑक्टोबर, २०२४ रोजी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी नांदेड जिल्ह्याचा दौरा केला. मा.प्रधान सचिव महोदयांनी जिल्हा परिषद नांदेड येथे आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकरी श्रीमती मिनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय ज्ञानोबा तुबाकले व इतर सबंधित अधिकारी उपस्थित होते.




त्याचप्रमाणे मा.प्रधान सचिव महोदयांनी परभणी जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद परभणी येथे ग्राम विकास विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेतला. या आढावा बैठकीला जिल्हा परिषद परभणीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतीशा माथुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रश्मी खांडेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमप्रकाश यादव व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी नांदेड व परभणी जिल्ह्यातील विविध विकास कामांचा आढावा घेत जिल्ह्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणेबाबत मार्गदर्शन केले. तसेच जिल्हास्तरावर येणाऱ्या अडचणी जाणून घेवून त्याबाबत मार्गदर्शन केले.



## ग्रामीण गृहनिर्माण अभियंता क्षमता बांधणी प्रशिक्षण यशदा, पुणे येथे संपन्न

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणेसाठी तसेच राबविण्यात आलेले उपक्रमांचे आदान प्रदान होण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने राज्यस्तरीय क्षमता बांधणी प्रशिक्षण दिनांक ९ ते ११ ऑक्टोबर, २०२४ या तीन दिवसांच्या कालावधीत यशदा, पुणे येथे आयोजित केले होते. या प्रशिक्षणाकरीता एकुण ३५ ग्रामीण गृहनिर्माण अभियंते उपस्थित होते.

दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रशिक्षणाच्या सुरूवातीला नाव नोंदणी, स्वागत व परस्पर परिचय सत्र संचालक, यशदा श्रीमती वीणा सुपेकर व सत्र सहायक श्री.अक्षय बनसोडे यांनी केले. पहिल्या सत्रात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-१ व २ व PM-JANMAN, इत्यादी आवास योजनांची सविस्तर माहिती, योजनांची अंमलबजावणी व या योजना राबवितांना येणारे आव्हाने व उपाय योजना याविषयी उपसंचालक (PMAY-G), ग्रामीण गृहनिर्माण श्री. नीलेश काळे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राबविण्यात आलेले महा आवास अभियान व या अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम याबाबत राज्य समन्वयक (M&E), ग्रामीण गृहनिर्माण डॉ.संघरत्न सोनवणे यांनी मार्गदर्शन केले.





दुपारच्या सत्रात अंमलबजावणीतील तंत्रे या विषयावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे, श्रीमती शालिनी कडू यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर घरकुल बांधकाम करतांना आवश्यक साधन सामुग्री, घरकुल बांधकामाचे तंत्रज्ञान, घरकुल बांधकामाचे टप्पे, बांधकाम करतांना येणारी आव्हाने व त्याबाबत करावयाच्या उपाय योजना या विषयी अभियंता, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे श्री. हनुमंत काकडे यांनी मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात प्रशिक्षणार्थींची गट बांधणी करून त्यांना सादरीकरण करण्याकरीता गटनिहाय विषय देण्यात आले. याबाबत वास्तुविशारद, ग्रामीण गृहनिर्माण श्री.परमेश्वर शेलार यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी पहिल्या सत्रात सर्व प्रशिक्षणार्थींशी गट चर्चा व दिनांक ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या प्रशिक्षणाचा मागोवा वास्तुविशारद, ग्रामीण गृहनिर्माण श्री.परमेश्वर शेलार यांनी घेतला. त्यानंतर राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची माहिती, या योजनांची अंमलबजावणी, योजना राबवितांना येणारी आव्हाने व त्यावर करावयाच्या उपाययोजना याविषयी उपसंचालक (राज्य योजना), ग्रामीण गृहनिर्माण, श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील विकसित बांधकाम तंत्रज्ञान या विषयावर वास्तुविशारद, ग्रामीण गृहनिर्माण श्री.परमेश्वर शेलार यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर घरे बांधणे, समुदाय तयार करणे व परवडणाऱ्या घरांच्या समाधानामध्ये सहभागी नियोजनाची भूमिका या विषयावर सहायक प्राध्यापक, नियोजन विभाग, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे डॉ.इशा पानसे यांनी मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात प्रत्येक गटाने त्यांना दिलेल्या विषयावर सादरीकरण केले. याबाबत आवश्यक मार्गदर्शन वास्तुविशारद, ग्रामीण गृहनिर्माण श्री.परमेश्वर शेलार यांनी केले.

दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी उर्वरीत प्रशिक्षणार्थींनी सादरीकरण केले. त्यानंतर इमारतींचे भूकंप प्रतिरोधक डिझाइन या विषयावर असोसिएट प्रोफेसर, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे डॉ.बाळकृष्ण डावरी यांनी मार्गदर्शन केले. गृहनिर्माणासाठी भारतीय दृष्टीकोन या विषयावर सहायक प्राध्यापक, सिव्हिल इंजिनीअरिंग विभाग, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे डॉ. आरती पेटकर यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात सर्व गटांचे समूह सादरीकरण आणि ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणीबाबत चर्चा व प्रशिक्षणाविषयी निर्माण झालेल्या प्रश्नावर उपसंचालक (PMAY-G), ग्रामीण गृहनिर्माण, श्री. नीलेश काळे व वास्तुविशारद, श्री. परमेश्वर शेलार यांनी मार्गदर्शन केले.

शेवटच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे मूल्यमापन व सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना प्रशिक्षणात सहभागी झाल्याबद्दल प्रशस्तीपत्र देण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप व संपूर्ण नियोजन सत्र संचालक, यशदा, पुणे श्रीमती वीणा सुपेकर यांनी केले.






## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंमलबजावणी यंत्रणेसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा

प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीणची अंमलबजावणी करणाऱ्या विविध राज्यांच्या ग्रामीण विकास विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार आणि भारतीय मानक ब्युरो (BIS) द्वारे दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ ट्रेनिंग फॉर स्टँडर्डायझेशन (NITS), सेक्टर ६२, नोएडा, उत्तर प्रदेश येथे एक दिवसीय क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस महाराष्ट्र राज्यातून राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री.राम आघाव व वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये देशात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यांमध्ये सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर प्रधानमंत्री आवास



योजना-ग्रामीण टप्पा-२ बाबत करावयाची कार्यवाही, राज्यांना दिलेले उद्दिष्ट व उद्दिष्टपूर्तीचे नियोजन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या आवास योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी बांधकाम साहित्य मानके आणि त्यांची निवड, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापन, इमारत डिझाइन आणि बांधकाम मानके, घर बांधणे - आर्किटेक्चरल पैलू, बीआयएस केअर ॲपचा परिचय आणि त्याचा प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये लागू असलेल्या तक्रारी आणि निकृष्ट प्रमाणित सामग्रीच्या खरेदीविरुद्ध तक्रार निवारण यंत्रणा, इत्यादी विषयांवर तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच या कार्यशाळेस उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना क्षमता बांधणी कार्यशाळेस सहभागी झाल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.





## ग्रामीण विकास भारत सरकार यांची प्रादेशिक कार्यशाळा रायपुर, छत्तीसगड येथे संपन्न

दिनांक १३ व १४ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांची प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन दिवसीय प्रादेशिक कार्यशाळा कोर्टयार्ड हॉटेल, रायपुर, छत्तीसगड येथे संपन्न झाली. या कार्यशाळेला ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकारच्या अधिकाऱ्यांसह देशातील गुजरात, महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व छत्तीसगड या राज्यातील प्रधानमंत्री आवास योजनेची अंलबजावणी करणारे राज्यस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

या कार्यशाळेकरीता महाराष्ट्र राज्यातून राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे उपसंचालक श्री.नीलेश काळे, राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री.राम आघाव, वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार व राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ श्री.दिनेश मोवळे इ. राज्यस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

या कार्यशाळेचा शुभारंभ दिनांक १३ नाव्हेंबर, २०२४ रोजी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, छत्तीसगड सरकार यांच्या हस्ते व मा.उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, श्री.गया प्रसाद, मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.शक्तीकांत सिंग, संचालक, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, छत्तीसगड सरकार श्री.रजत बंसल व सहसंचालक (NIC), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.अजय मोर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

शुभारंभीय कार्यक्रमानंतर या कार्यशाळेचे प्रास्ताविक मा.उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, श्री. गया प्रसाद यांनी मांडले. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण बाबत संचालक, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, छत्तीसगड सरकार श्री.रजत बंसल यांनी सादरीकरण केले. मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.शक्तीकांत सिंग यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण च्या प्रगतीबाबत सादरीकरण केले. सहसंचालक (NIC), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.अजय मोर यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ व २ अंतर्गत उद्दिष्टपूर्ती बाबत नियोजन करण्यात आले. HUDCO चे प्रतिनिधी श्री.विवेक गुप्ता यांनी घरकुल बांधकाम तंत्रज्ञानविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित सर्व राज्यांनी आपल्या






राज्यातील नाविन्यपूर्ण उपक्रमांविषयी सादरीकरण केले. महाराष्ट्र राज्याच्या वतीने उपसंचालक श्री.नीलेश काळे यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रगती व आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांबाबत सादरीकरण केले. सहसंचालक (NIC), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.अजय मोर यांनी आवास प्लस ॲप बाबत व तांत्रिक अडचणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

दिनांक १४ नोव्हेंबर, २०२४ रोजी टिम A व टिम B चे गठण करून रायपूर जिल्ह्यातील चर्रा गावांमध्ये क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले. या क्षेत्रीय भेटी दरम्यान प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पूर्ण झालेल्या घरकुलांची पहाणी करण्यात आली. तसेच ग्रामस्तरावर ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी व लाभार्थी यांचेशी चर्चा करण्यात आली. छत्तीसगड सरकारने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण च्या अंमलबजावणीबाबत उभारण्यात आलेल्या स्टॉलला भेट दिली. त्यानंतर या कार्यशाळेचा समारोप बरदिहा रेस्टारेंट, धर्माबाद येथे करण्यात आला. या समारोप कार्यक्रमाकरीता जिल्ह्याचे जिल्हाधिकारी उपस्थित होते.






## सांगली जिल्ह्यातील मिरज व आटपाडी येथे घरकुल मंजुर घरकुल लाभार्थी मेळावा

जिल्हा परिषद सांगली अंतर्गत पंचायत समिती मिरज येथे पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.ज्ञानदेव मडके यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी पंचायत समिती मिरज व आटपाडी येथे सकाळ व दुपार या दोन सत्रात सन २०२४-२५ मधील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुल मंजूर लाभार्थी मेळावा घेण्यात आला.

या लाभार्थी मेळाव्याला पंचायत समिती मिरज येथे विस्तार अधिकारी श्री.संतोष इंगळे, विस्तार अधिकारी (कृषी) श्रीमती श्रद्धा पवार, श्रीमती रमणी कांबळे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री.ऋषभ पाटील, श्री.ऋषीकेश कुलकर्णी, वरिष्ठ सहाय्यक श्री.भारत कांबळे, श्रीमती समिक्षा वळवडे, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री.स्वप्निल काशीद व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे पंचायत समिती आटपाडी येथे गट विकास अधिकारी श्री.भंडारे, विस्तार अधिकारी श्री.कदम, संबंधित विस्तार अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी देय अनुदान, हप्ते वितरण प्रणाली, हप्ते वितरणाचे टप्पे, घरकुल बांधकाम पध्दती व साहित्याची उपलब्धता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

त्यासोबतच लाभार्थ्यांना घरकुलासह इतर शासकीय योजनांच्या कृती संगमातून मिळणाऱ्या लाभाबाबात जसे- लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**, शौचालयासाठी **स्वच्छ भारत मिशन- ग्रामीण**, नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी **जल जीवन मिशन**, गॅस जोडणीसाठी **प्रधानमंत्री उज्ज्वला योजना**, विद्युत जोडणी साठी **सौभाग्य योजना**, उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन**, उर्जेच्या बचतीसाठी **महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा)**, इ. योजनांबाबत माहिती देण्यात आली. तसेच बहुमजली इमारती, गृहसंकुले,हाऊसिंग अपार्टमेंट यांच्या उभारणीतून जागेची कमतरता व जागेच्या वाढत्या किमती यावर उपाय योजनाबाबत मार्गदर्शन केले.






## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठका

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांच्या आढावा बैठका घेण्यात आल्या. याबैठकांमध्ये संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले.

मा.प्रधान सचिव यांनी सर्व विभागांचा जिल्हानिहाय आढावा घेऊन प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ज्या जिल्हयांमध्ये अपूर्ण घरकुलांची संख्या जास्त आहे, अशा सर्व जिल्ह्यांनी माहे डिसेंबर -२०२४ अखेर सर्व अपूर्ण घरकुले पूर्ण करणे. पंडित दीनदयाळ जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणे, ग्रामीण भागातील निवासी प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण नियमानुकुल करणे व इतर माध्यमांतून जसे की, बक्षिसपत्र, भाडेपट्टा इ. योजनांमधून भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन द्यावी. प्रलंबित घरकुलांसाठी गवंडी प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त वापर करावा. सर्व जिल्ह्यांनी आपली लाभार्थीनिहाय करण्यात आलेली विगतवारी तपासून घ्यावी. प्रधानमंत्री–जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM- JANMAN) - अंतर्गत उर्वरित घरकुलांचे सर्वेक्षण पूर्ण करणे. तसेच उर्वरित मंजूरी, प्रथम हप्ता वितरण व मंजूरी दिलेली घरकुले तात्काळ पूर्ण करणे. लाभार्थ्यांची आधार सिडींग, आधार Authentication व आधार Verification या प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करणे. क्षेत्रीय भेटीबाबत ॲप वर माहिती अपलोड करणे.तात्काळ मंजूरीची प्रक्रिया पूर्ण करून मंजूरी दिलेली घरकुले वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करणे. अशा सूचना मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी दिल्या.




## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोहिम

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-१ व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करणे व प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ चा पहिला हप्ता वितरण करण्यासाठी दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ ते २९ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त (विकास) व सहा. आयुक्त (विकास) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या उपस्थितीत मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेकरीता राज्यस्तरावरून विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथे नागपूर विभागाचे संपर्क अधिकारी म्हणून सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती अपर्णा पाटणे व राज्य समन्वयक (M&E) डॉ. संघरत्न सोनवणे उपस्थित होते.

विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे अमरावती विभागाचे संपर्क अधिकारी उपसंचालक, श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे व राज्य समन्वयक (MIS) श्री. संघपाल चव्हाण उपस्थित होते.





विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर विभागाचे संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (IT)श्री. राम आघाव उपस्थित होते.



जिल्हा परिषद नंदुरबार येथे नाशिक विभागाचे संपर्क अधिकारी म्हणून प्रशिक्षण समन्वयक (लॅण्ड) श्री.मधुकर वाघ व राज्य समन्वयक (MIS) श्री. मायकल एल्डन उपस्थित होते.

जिल्हा परिषद पुणे येथे पुणे व कोंकण विभागाचे संपर्क अधिकारी म्हणून उपसंचालक श्री. नीलेश काळे व प्रशिक्षण समन्वयक (IT) श्री. विवेक गोहिल उपस्थित होते.

या मोहिमेकरीता जिल्हा प्रोग्रामर त्यांच्या विभागातील नमूद ठिकाणी उपस्थित होते. तसेच या




मोहिमेत विभागीय प्रोग्रामरचा पूर्ण वेळ सक्रिय सहभाग राहिला. उपायुक्त (विकास) व सहा. आयुक्त (विकास) यांनी या मोहिमेमध्ये लक्ष देवून दैनंदिन अहवाल घेवून मोहिम यशस्वीतेसाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न केले.

या मोहिमे अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-१ व सर्व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, पंरतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, ते फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केलेले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केलेले नाहीत, अशी सर्व घरकुले online पूर्ण करणे. Plinth व Lintel Level वरील घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करुन घरकुल Physically पूर्ण करणे. Delayed Houses मधील घरकुले पूर्ण करणे. आधार सिडिंग, आधार Authentication व आधार Verification पूर्ण करणे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ पहिला हप्ता वितरण करणे. इ. बाबत कार्यवाही करण्यात आली.

या मोहिम कालावधीत ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी त्यांना ठरवून दिलेल्या कार्यक्षेत्रात उपस्थित होते. या मोहिमेत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सक्रिय सहभागी होते.



## पुणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची घरकुल योजनांच्या गतीमानतेसाठी दौंड येथे बैठक

दिनांक ०४ डिसेंबर, २०२४ रोजी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विलास पाटील यांनी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व घरकुल बांधकामाची तपासणी करण्यासाठी पंचायत समिती दौंड येथे भेट दिली.

यावेळी श्री.विलास पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ व टप्पा-२ आणि राज्यपुरस्कृत सर्व आवास योजनाच्या कामांचा आढावा घेतला. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ अंतर्गत अपूर्ण घरकुलांची कामे तात्काळ पूर्ण करणे व टप्पा-२ अंतर्गत घरकुलांना मंजुरी देण्याची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या. राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत जी घरकुल अपूर्ण आहेत अशा घरकुलांना भेटी देवून त्यांची कामे पूर्ण करणे, जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास टाळाटाळ करीत आहे.त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करणे. अशा सुचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्यात. याकामी कोणत्याही प्रकारचे सहकार्य लागल्यास करणार असल्याची ग्वाही मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विलास पाटील यांनी दिली.



## सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन पुणे येथे घरकुल स्टॉलची उभारणी

मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस व मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य श्री. चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी २.०० वा. आई.सी.ए.आर.-अटारी, पुणे येथे किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाकरीता पुणे जिल्ह्यामधील ग्रामीण भागातील कृषी आणि घरकुल योजनांच्या लाभार्थ्यांसह इतर लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री-जनमन आवास योजना, राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबविण्यात येणारे नाविन्यपूर्ण उपक्रम या विषयी सर्व सामान्यास माहिती व्हावी आणि याची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती व्हावी याकरीता संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य व्यवस्थापन कक्षाने किसान एंव ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन कार्यक्रम स्थळी घरकुल स्टॉलची उभारणी केली.

या घरकुल स्टॉलला मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस व मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य श्री. चंद्रकांत पाटील यांच्यासह उपस्थित सर्व अधिकारी, पदाधिकारी, लाभार्थी व लोकांनी भेटी दिल्या. यावेळी संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी मान्यवरांना महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत योजना, महा आवास अभियान व अभियान कालावधीत राबविण्यात आलेले बहुमजली इमारती, गृहसंकुले, हाऊसिंग अपार्टमेंट, लॅण्ड बँक, सॅण्ड बँक, डेमो हाऊसेस, कॉप-शॉप, घरकुल मार्ट व इतर नाविन्यपूर्ण उपक्रमांविषयी माहिती दिली.

या घरकुल स्टॉल मध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांची माहिती देणारी घडी पुस्तिका व महा आवास त्रैमासिक उपलब्ध होते. स्टॉलवर भेट देणाऱ्या सर्व व्यक्तिंना घडी पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.






## राज्यात २० लक्ष घरकुलांचा लाभ देण्याची मा.मुख्यमंत्री यांची घोषणा

किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन कार्यक्रमाप्रसंगी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी १९ लाख ६६ हजार घरे यावर्षी देण्यात येत असल्याचे मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलतांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्यातील बेघर, गरीब, भूमिहीन व गरजुंना २० लक्ष घरकुले देणार असल्याची घोषणा केली.

केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र राज्यासाठी १३,२९,६७८ घरांचे अतिरिक्त लक्ष्य मंजूर केले असून त्याबाबतचे पत्र मा.मंत्री, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिले असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी सांगितले. याकरीता देशाचे मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी व ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे त्यांनी आभार मानले. तसेच आमची सर्व यंत्रणा येत्या कालावधीत घरकुल उद्दिष्टपूर्तीसाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न करणार असल्याचेही यावेळी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना सांगितले.



## किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन कार्यक्रमात घरकुल लाभार्थी सन्मानीत

दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी २.०० वा. आई.सी.ए.आर.-अटारी, पुणे येथे किसान एवं ग्रामीण विकास लाभार्थी सम्मेलन आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाकरीता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुले पूर्ण केलेले लाभार्थी उपस्थित होते. यापैकी काही लाभार्थ्यांना मा.मंत्री, ग्रामीण विकास व कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार श्री.शिवराज सिंह चौहान, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस व मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य श्री. चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मानित करण्यात आले.तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुले पूर्ण झालेल्या काही लाभार्थ्यांनी प्रातिनिधीक स्वरूपात मनोगत व्यक्त केले.



## निर्धार ग्रामीण विकासाचा चर्चासत्रात ग्रामीण गृहनिर्माण संचालक सहभागी

दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी निर्धार ग्रामीण विकासाचा चर्चासत्राचे थेट प्रक्षेपण डि.डि. सह्याद्री प्रसार वाहिनीवर करण्यात आले. या चर्चा सत्रामध्ये ग्राम विकास विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजना व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यासाठी संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे, ग्रामीण कौशल्य विकास योजनांची माहिती देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, श्री.विक्रांत बगाडे व महिला बचत गट, उमेद अभियानाची माहिती देण्यासाठी अतिरिक्त संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशन श्री.परमेश्वर राऊत सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ.राजाराम दिघे यांनी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची भुमिका, जबाबदारी व कार्यालयामार्फत योजनांचे संनियंत्रण व मूल्यमापन, भागधारकासांठी क्षमता बांधणी कार्यक्रम, प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम, समन्वय उपक्रम व केंद्र व राज्य शासनाला ग्रामीण गृहनिर्माण संबंधित इनपुट या विषयी माहिती दिली.

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास, शबरी आवास, पारधी आवास, आदिम आवास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना आणि मोदी आवास योजना राबविण्यात येतात. या योजनेच्या पात्रतेचे निकष, आवश्यक कागदपत्र, लाभार्थी निवड निकष, योजनेतून मिळणारे अनुदान, हप्ते वितरण प्रणाली, घरकुल बांधकामाचे टप्पे, जिल्हा व तालुका स्तरावर अंमलबजावणी यंत्रणा या विषयीची महत्वाची माहिती डॉ.राजाराम दिघे यांनी दिली.

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राबविण्यात आलेले 'महा आवास अभियान-ग्रामीण' याविषयी डॉ.राजाराम दिघे यांनी प्रकाश टाकला. सन २०२०-२१ मध्ये राबविण्यात आलेल्या अभियानामुळे लाखो गरिब, गरजू, बेघर व भुमिहीन लाभार्थांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले. या अभियानात आलेले यश लक्षात घेता शासनाने दरवर्षी 'महा आवास अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानामध्ये भुमिहीन लाभार्थ्यांसाठी बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेट उभारणी करून त्यांना घरकुलाचा लाभ दिला. भुमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी १ लक्ष अर्थसहाय्य, घरकुलासह शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून इतर योजनांचा लाभ, अशी महत्वाची माहिती संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी दिली.






## मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ च्या अंमलबजावणीसाठी समन्वय बैठक

दिनांक २९ नोव्हेंबर, २०२४ रोजी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांची समन्वय बैठक घेण्यात झाली.

या बैठकीमध्ये उपसंचालक, ग्रामीण गृहनिर्माण श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे यांनी गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले. तसेच प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्यपुरस्कृत योजनांचा सर्व विभागांचा जिल्हानिहाय आढावा घेतला.

राज्यातील उर्वरित घरकुलांना मंजूरी देण्याची प्रक्रिया माहे सप्टेंबर, २०२४ अखेर पूर्ण करण्याबाबत दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीत निर्देश दिले होते. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ मधील सर्व अपूर्ण घरकुले तात्काळ पूर्ण करण्याबाबत त्यांनी सुचना दिलेल्या असल्याचे मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी सांगितले.

तथापि, या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना –ग्रामीण टप्पा-२ चा आढावा घेत असतांना जिल्हयांतील उद्दिष्टानुसार घरकुलांना मंजूरी देणेबाबतची प्रक्रिया ही असमानधकारक असल्याचे मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी सांगितले. राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा-२ च्या मंजूरी संदर्भातील असमानधानकारक कामगिरीबाबत परभणी (२१६९), जालना (४३४८), हिंगोली (५०५४), नाशिक (५२३३), यवतमाळ (५८९८), बुलढाणा (६०७१), नंदुरबार (६४७४), नांदेड (६६५१), अमरावती (८२३३), जळगाव (१०१२४) या जिल्हयांबाबत मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना –ग्रामीण मधील अपूर्ण घरकुलांची विगतवारी आवास सॉफ्ट प्रणालीवर पुढील तीन category मध्ये वर्गीकरण करण्याबाबतचे दिनांक ०७ जून, २०२४ रोजीच्या पत्राने सर्व जिल्हयांना सुचित केले होते.

A Category - जी घरकुले दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी पर्यंत होऊ शकतील, अशी घरकुले.

B Category - जी घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण होऊ शकत नाही, पण अशा घरकुलांना वितरीत केलेल्या हप्त्याची वसुली करणे शक्य आहे, अशी घरकुले.

C Category - जी घरकुले पूर्ण होऊ शकत नाही आणि घरकुलांना वितरीत केलेली हप्त्याची रक्कमेची वसुली होऊ शकत नाही, अशी घरकुले.

विगतवारीमधील C category मध्ये जास्त लाभार्थ्यांची संख्या दर्शविण्यात आलेली आहे. सर्व जिल्ह्यांनी आपली लाभार्थीनिहाय करण्यात आलेली विगतवारी पुनःश्च तपासून घ्यावी व पूर्ण होऊ शकणारी घरकुले तात्काळ पूर्ण करण्याची कार्यवाही करण्याबाबत मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांनी सूचित केले.



## घरकुला पासून वंचित लाभार्थ्यांसाठी बुलढाणा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा पुढाकार

दिनांक १४ डिसेंबर, २०२४ रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी व भुमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करण्यासाठी बुलढाणा येथे विशेष कॅम्पचे आयोजन केले.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत भुमिहीन लाभार्थ्यांना जागेचा लाभ देण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत जागा खरेदीसाठी रक्कम रू. ५० हजार वाढवून रू. १ लक्ष केली आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त भुमिहीन लाभार्थ्यांना मिळावा यासाठी सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व गावातील प्रतिष्ठीत नागरिक यांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा यांनी केले.




# संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली भागधारकांच्या समन्वय बैठका

राज्यात राबविण्यात येत असलेल्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत राज्यातील सर्व भागधारकांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे नियमित समन्वय बैठका घेवून घरकुल योजनांच्या कामांचा आढावा घेतला. तसेच त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले.

या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हास्तरीय प्रोग्रामर व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये तालुक्यातील मनरेगा ऑपरेटर व घरकुल योजनेचा ऑपरेटर यांच्यामध्ये समन्वय ठेवून लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते वेळेत वितरीत करणे, ग्रामसेवक/लाभार्थी/ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्या कडून प्रस्ताव/कागदपत्र वेळेत उपलब्ध करणे, घरकुलांना विनाविलंब मंजूरी देणे, भौतिकदृष्टया पुर्ण असलेली घरकुलांना शेवटचा हप्ता वितरीत करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, अपुर्ण घरकुले पूर्ण करणे, घरकुले आर्थिक व भौतिकदृष्ट्या विहित वेळेत पूर्ण होणेसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, प्रलंबित घरकुले (Delayed Houses) लोक अदालत किंवा इतर मार्गाने पूर्ण करणे, अपात्र लाभार्थ्यांची रिमांड प्रक्रिया पूर्ण करणे, विविध योजनांच्या कृतीसंगमाचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना देणे, जागेचा वाद, करारनामा अप्राप्त, मयत लाभार्थी, अकाउंट व्हेरिफिकेशन, राज्य योजनेतील बदली प्रस्ताव याबाबत ग्रामपंचायतनिहाय संपर्क अधिकारी नेमून लाभार्थी निहाय पडताळणी करणे, इ. बाबतची कार्यवाही करण्याच्या सूचना संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी दिल्या.

त्याचप्रमाणे बहुमजली इमारती, गृह संकुले व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे, डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सुरू करणे, घरकुल मार्ट सुरू करणे, सॅण्ड बँक उभारणी, लॅण्ड बँक उभारणी, मॉडेल हाऊसेसची निर्मिती व शासकीय जमीनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, अशा सूचना संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी या बैठकांमध्ये दिल्या.




# रायगड मधील माणगाव तालुक्यात घरकुलांमुळे उघडली अनेकांच्या स्वप्नाची दारे

दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी रायगड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी माणगाव पंचायत समिती येथे भेट दिली. तसेच माणगाव अंतर्गत ग्रामपंचायत साजे ,गागवली व सणसवाडी येथील प्रधानमंत्री-जनमण आवास योजनेअंतर्गत घरकुल पाहणी व महिला स्वयंसहाय्यता समूह यांना भेट दिली.

यावेळी माणगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.संदीप जठार, शाखा अभियंता, विस्तार अधिकारी (पंचायत), विस्तार अधिकारी (सांख्यिकी), विस्तार अधिकारी (कृषी), ग्रामपंचायत अधिकारी , ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व लाभार्थी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका आज घरकुल योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यात अग्रेसर ठरत आहे. या तालुक्यातील ग्रामविकासाचे हे एक अद्भुत उदाहरण आहे. राज्य शासनाने "प्रधानमंत्री जनमन आवास योजना" व "रमाई घरकुल योजना" यांसारख्या योजनांद्वारे गोरगरिबांना निवारा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. त्याचा परिणाम माणगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये दिसून येत आहे.या तालुक्यात ७४ ग्रामपंचायती असून या तालुक्यांतर्गत घरकुलासाठी २,०५३ लाभार्थांचा सर्व्हे करण्यात आला आहे. त्यापैकी १,९१८ पात्र लाभार्थी ठरविण्यात आले असून १३५ ऑनलाईन अपात्र लाभार्थी ठरविण्यात आले आहे. यामधून १,३७९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून ३२९ घरकुले बांधून पूर्ण झाली आहेत. उर्वरित १,०५० घरकुले बांधकामाच्या विविध टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात माणगाव तालुका घरकुल योजनेत अग्रेसर ठरला असून या घरकुलांमुळे अनेकांच्या स्वप्नांची दारे उघडली आहेत.



## नांदेड मध्ये अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी क्षेत्रीय भेटी व समन्वय बैठकांचे आयोजन

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेडचे प्रकल्प संचालक डॉ.संजय तुबाकले यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी पंचायत समिती नायगाव व दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी पंचायत समिती बिलोली येथे समन्वय बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा २ व इतर राज्य पुरस्कृत आवास घरकुल मंजुरी, पहिला हप्ता वितरण, अपूर्ण घरकुले पूर्ण करणे व प्रलंबित घरकुले याबाबत लाभार्थीनिहाय आढावा घेण्यात आला.

आढावा बैठकीनंतर डॉ.संजय तुबाकले यांनी नायगाव व बिलोली तालुक्यातील ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांची पहाणी केली. यावेळी त्यांनी घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांचा सत्कार केला. त्याचप्रमाणे अपूर्ण असलेल्या घरकुल लाभार्थ्यांची भेट घेवून त्यांना घरकुले पूर्ण करणेकामी आवश्यक मार्गदर्शन केले. याकामी सरपंच व ग्रामसेवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.



## प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षण अत्यंत प्रभावी माध्यम

प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण केले. तसेच मुल्यांकन(Assessment) पूर्ण करुन माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले (Deleayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षण अत्यंत प्रभावी माध्यम असल्याची प्रतिक्रिया सर्व स्तरावरून येत आहे.

प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल तयार करून या पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येत असल्याने घरकुलांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आली आहे.



## करवीर तालुक्यात प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन

विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पहिला हप्ता घेवून घरकुल बांधकाम सुरू न करणारे तसेच दुसरा हप्ता घेवून घरकुलांचे बांधकाम पूर्ण न करणारे लाभार्थी यांची घरकुले पूर्ण करण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२४ रोजी कोल्हापुर जिल्ह्यातील करवीर तालुक्यामध्ये लोक अदालत घेण्यात आली.

तालुका विधी सेवा समिती राष्ट्रीय लोक अदालत करवीर जिल्हा कोल्हापूर घरकुल विभाग पंचायत समिती करवीर यांच्या वतीने केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनेचा पहिला हप्ता घेऊन अद्यापही काम चालू नाही केलेल्या लाभार्थ्यांना १५ ते २० दिवसाच्या आत घरकुलाचे बांधकाम सुरू करण्याचे अन्यथा अनुदानाची रक्कम शासन खाती जमा करण्याचे सक्त आदेश देण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व संगणक परिचालक उपस्थित होते.



# महा आवास अभियान २०२४-२५

'सर्वांसाठी घरे' हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या ग्रामीण गृहनिर्माण योजनासह पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना व ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणे अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) मधील ध्येय क्रमांक ११ नुसार किफायतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण १७ SDG पैकी किमान १४ SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक राहावी, नाविन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुले उपलब्ध करुन द्यावीत, तसेच नैसर्गिक आपत्ती प्रतिरोधक घरकुले बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे.

यासाठी राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते दिनांक ०५ जून, २०२१ या कालावधीत 'महा आवास अभियान-ग्रामीण' राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये आलेली गतिमानता व गुणवत्ता यामध्ये सातत्य राखण्यासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२२ या कालावधीत 'महा आवास अभियान २.०' राबविण्यात आले. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात जलदगतीने लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी दिनांक ०१ जुलै, २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत 'अमृत घरकुल मोहीम' राबविण्यात आली. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून ते दिनांक ०५ जून, २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" राबविण्यात आले. त्याचप्रमाणे गतवर्षी दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ या कालावधीत 'महा आवास अभियान २०२३-२४' राबविण्यात आले.

राज्यात राबविण्यात आलेल्या या सर्व अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये जेथे घरकुल बांधकामासाठी जागेची कमतरता आहे अशा ठिकाणी बहुमजली इमारती, जेथे जागेची उपलब्धता आहे अशा ठिकाणी गृह संकुले, जागेच्या वाढत्या किंमती लक्षात घेता हाऊसिंग अपार्टमेंट, डेमो हाऊस मध्ये कॉप-शॉप, घरकुल बांधकाम साहित्य वाजवी दरात व नजीकच्या ठिकाणी उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट, प्रशिक्षित गवंडी उपलब्धतेसाठी गवंड्यांचे पॅनेल तयार करणे, लाभार्थी व लोकांना मार्गदर्शनासाठी महा आवास हेल्प लाईन, रिलायन्स, हुडको, आय.आय.टी. बॉम्बे, रोटरी इंटरनॅशनल, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या सारख्या नामांकीत संस्थांशी भागीदारी व नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर यासाठी राज्याबाहेर दौरे यासारखे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राज्यात राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांचे कौतुक महाराष्ट्रासह देशपातळीवरही होत आहे.

ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाला ग्रामीण गृहनिर्माण योजना संबंधित धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अनेक इनपुट दिले. त्याचाच एक भाग म्हणून सन २०२०-२१, सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या ४ वर्षात महा आवास अभियानामुळे लाखो गरीब, गरजू, बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांचे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न झाले.

दरवर्षी २० नोव्हेंबर हा राष्ट्रीय आवास दिन म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात महा आवास अभियानाचा शुभारंभ करण्यात येतो. परंतु यावर्षी विधानसभा निवडणूका असल्याने अभियान कालावधीत बदल करून सन २०२४-२५ मध्ये महा आवास अभियान राबविण्याचा प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत सादर केला. दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत "महा आवास अभियान २०२४-२५" राबविणे प्रस्तावित केले आहे.

"सर्वांसाठी घरे" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हा या अभियानाचा हेतू आहे. '**महा आवास अभियान २०२४-२५**' राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून येत्या कालावधीत मान्यता मिळण्याची शक्यता आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ५०१५ | ५०१५ | ४९८५ | **९९.४०** | १ | ५९ |
| २ | रत्नागिरी | ९६२६ | ९६२६ | ९५३८ | **९९.०९** | २ | ७४ |
| ३ | पालघर | ३५०९० | ३५०९० | ३४६०७ | **९८.६२** | ४ | १३५ |
| ४ | रायगड | ९६५८ | ९६५८ | ९५२३ | **९८.६०** | ५ | १०० |
| ५ | ठाणे | ९४७६ | ९४७६ | ९२५७ | **९७.६९** | ८ | १५५ |
| **कोकण विभाग** | | **६८८६५** | **६८८६५** | **६७९१०** | **९८.६१** | **१** | |
| ६ | गोंदिया | ९५२०७ | ९५२०७ | ९४१८२ | **९८.९२** | ३ | १५८ |
| ७ | वर्धा | १७३६८ | १७३६८ | १६६०४ | **९५.६०** | ९ | ९२ |
| ८ | गडचिरोली | ३१४९१ | ३१४९१ | ३००६० | **९५.४६** | १० | २३९ |
| ९ | भंडारा | ६३३९६ | ६३३९६ | ६०२४८ | **९५.०३** | १३ | २६७ |
| १० | चंद्रपूर | ४१८६६ | ४१८६६ | ३९११४ | **९३.४३** | १६ | १५२ |
| ११ | नागपूर | ३५७२५ | ३५७२५ | ३३२०६ | **९२.९५** | १८ | ३३५ |
| **नागपूर विभाग** | | **२८५०५३** | **२८५०५३** | **२७३४१४** | **९५.९२** | **२** | |
| १२ | नाशिक | ८९००३ | ८९००३ | ८४८८६ | **९५.३७** | ११ | १९३ |
| १३ | नंदुरबार | ११८२७६ | ११८२७६ | ११२७०४ | **९५.२९** | १२ | ३१४ |
| १४ | अहिल्यानगर | ५९१५० | ५९१५० | ५५४८५ | **९३.८०** | १५ | १३९ |
| १५ | धुळे | ६४५७६ | ६४५७६ | ६००२४ | **९२.९५** | १७ | ३२२ |
| १६ | जळगाव | ७६८३९ | ७६८३९ | ६७०२३ | **८७.२३** | २९ | ५१० |
| **नाशिक विभाग** | | **४०७८४४** | **४०७८४४** | **३८०१२२** | **९३.२०** | **३** | |
| १७ | वाशिम | १८२४४ | १८२४४ | १७८९८ | **९८.१०** | ६ | ५६ |
| १८ | अकोला | ४६४४१ | ४६४४१ | ४३८३१ | **९४.३८** | १४ | ३७९ |
| १९ | यवतमाळ | ६२७७१ | ६२७७१ | ५७५४२ | **९१.६७** | २१ | १४५ |
| २० | अमरावती | ८८१६६ | ८८१६६ | ८०३५० | **९१.१३** | २२ | ५०१ |
| २१ | बुलढाणा | ३९७९२ | ३९७९२ | ३४५५९ | **८६.८५** | ३१ | ४८८ |
| **अमरावती विभाग** | | **२५५४१४** | **२५५४१४** | **२३४१८०** | **९१.६९** | **४** | |
| २२ | सातारा | १४२७१ | १४२७१ | १३९६८ | **९७.८८** | ७ | १० |
| २३ | कोल्हापूर | १६६१९ | १६६१९ | १५४४४ | **९२.९३** | १९ | १११ |
| २४ | सांगली | २०४२६ | २०४२६ | १८७२५ | **९१.६७** | २० | ४८७ |
| २५ | सोलापूर | ४४२१८ | ४४२१८ | ३९९१० | **९०.२६** | २३ | ३११ |
| २६ | पुणे | १८६९३ | १८६९३ | १६६७७ | **८९.२२** | २५ | ४३५ |
| **पुणे विभाग** | | **११४२२७** | **११४२२७** | **१०४७२४** | **९१.६८** | **५** | |
| २७ | बीड | ३४३३५ | ३४३३५ | ३०८२४ | **८९.७७** | २४ | ४०१ |
| २८ | धाराशिव | १२८९९ | १२८९९ | ११४३७ | **८८.६७** | २६ | ३९९ |
| २९ | हिंगोली | १६९६३ | १६९६३ | १५००४ | **८८.४५** | २७ | १०४ |
| ३० | जालना | २३७२३ | २३७२३ | २०८९६ | **८८.०८** | २८ | ३२४ |
| ३१ | लातूर | १९२२३ | १९२२३ | १६७१७ | **८६.९६** | ३० | ४३२ |
| ३२ | छत्रपती संभाजी नगर | ३५९०६ | ३५९०६ | ३१०८० | **८६.५६** | ३२ | २९० |
| ३३ | नांदेड | ६८३०१ | ६८३०१ | ५८८८२ | **८६.२१** | ३३ | ५३६ |
| ३४ | परभणी | १८६२३ | १८६२३ | १५७१६ | **८४.३९** | ३४ | १५१ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **२२९९७३** | **२२९९७३** | **२००५५६** | **८७.२१** | **६** | |
| **एकूण** | | **१३६१३७६** | **१३६१३७६** | **१२६०९०६** | **९२.६२** | | |

# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | १६०४ | १६०४ | ० | १००.०० | १ |
| २ | सिंधुदुर्ग | ६०५ | ६०५ | १ | १००.०० | २ |
| ३ | रायगड | ५२१५ | ५१५३ | ६ | ९८.८१ | ५ |
| ४ | ठाणे | ६६४२ | ६४१४ | २ | ९६.५७ | १४ |
| ५ | पालघर | २५८०६ | २४३१४ | ५ | ९४.२२ | २० |
| | **कोकण विभाग** | **३९८७२** | **३८०९०** | **१४** | **९५.५३** | **१** |
| ६ | भंडारा | ८५७८ | ८५५० | १४ | ९९.६७ | ३ |
| ७ | गडचिरोली | १८३२७ | १७९७२ | २२ | ९८.०६ | ८ |
| ८ | गोंदिया | १७६८२ | १७३१६ | ३२१ | ९७.९३ | ९ |
| ९ | चंद्रपूर | २०९२८ | १९८५४ | १८ | ९४.८७ | १८ |
| १० | वर्धा | ७६०८ | ६९९९ | ४३ | ९२.०० | २५ |
| ११ | नागपूर | ७३९४ | ६१५५ | २९ | ८३.२४ | ३२ |
| | **नागपूर विभाग** | **८०५१७** | **७६८४६** | **४१८** | **९५.४४** | **२** |
| १२ | कोल्हापूर | ७३५२ | ७३२७ | ५ | ९९.६६ | ४ |
| १३ | सांगली | ५२६२ | ५१३३ | ४१ | ९७.५५ | १० |
| १४ | सातारा | ३७५९ | ३६६४ | ९१ | ९७.४७ | ११ |
| १५ | पुणे | ८३७३ | ७९२७ | ८ | ९४.६७ | १९ |
| १६ | सोलापूर | १४७६६ | १३१९५ | ५९ | ८९.३६ | २८ |
| | **पुणे विभाग** | **३९५१२** | **३७२४६** | **२०४** | **९४.२७** | **३** |
| १७ | अहिल्यानगर | २१७७६ | २११९२ | १४६ | ९७.३२ | १२ |
| १८ | धुळे | ३०५७३ | २९५१२ | १२ | ९६.५३ | १५ |
| १९ | नाशिक | ५३२६४ | ४९७७२ | १७ | ९३.४४ | २२ |
| २० | नंदुरबार | ४५५४८ | ४२३९० | १२ | ९३.०७ | २३ |
| २१ | जळगाव | ३३९०६ | २८९०४ | ४४ | ८५.२५ | ३० |
| | **नाशिक विभाग** | **१८५०६७** | **१७१७७०** | **२३१** | **९२.८२** | **४** |
| २२ | वाशिम | १५२४० | १४९९८ | ७५ | ९८.४१ | ७ |
| २३ | अकोला | १००२३ | ९५१२ | १३९ | ९४.९० | १७ |
| २४ | यवतमाळ | ५०७५६ | ४७०६३ | ११० | ९२.७२ | २४ |
| २५ | अमरावती | २४०८४ | २१२६२ | १५२ | ८८.२८ | २९ |
| २६ | बुलढाणा | १९५५२ | १६६३८ | १५ | ८५.१० | ३१ |
| | **अमरावती विभाग** | **११९६५५** | **१०९४७३** | **४९१** | **९१.४९** | **५** |
| २७ | बीड | २०७८४ | २०४८४ | २४२ | ९८.५६ | ६ |
| २८ | छत्रपती संभाजी नगर | २३७६५ | २३०११ | १३२ | ९६.८३ | १३ |
| २९ | लातूर | १३९७४ | १३४२६ | ४७ | ९६.०८ | १६ |
| ३० | नांदेड | ५२७४७ | ४९३२० | ३९८ | ९३.५० | २१ |
| ३१ | परभणी | १४०११ | १२८७३ | १०३ | ९१.८८ | २६ |
| ३२ | धाराशिव | ७८८६ | ७२४३ | ८६ | ९१.८५ | २७ |
| ३३ | जालना | २१६६० | १७९७५ | ८७ | ८२.९९ | ३३ |
| ३४ | हिंगोली | १७६३९ | १३४४५ | ९२ | ७६.२२ | ३४ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **१७२४६६** | **१५७७७७** | **११८७** | **९१.४८** | **६** |
| | **एकूण** | **६३७०८९** | **५९१२०२** | **२५४५** | **९२.८०** | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | २३२९ | २१५८ | २०६६ | ९५.७४ | १ |
| २ | रत्नागिरी | ७०७५ | ६६५४ | ६२३२ | ९३.६६ | ३ |
| ३ | पालघर | ६९८ | ५१३ | ४५२ | ८८.११ | ४ |
| ४ | रायगड | २९१४ | २४३२ | २०१२ | ८२.७३ | ९ |
| ५ | ठाणे | १८२६ | १५६६ | ११८२ | ७५.४८ | १९ |
| | कोकण विभाग | १४८४२ | १३३२३ | ११९४४ | ८९.६५ | १ |
| ६ | सातारा | १२१०८ | ११२०३ | १०६६१ | ९५.१६ | २ |
| ७ | सांगली | १०६६४ | ९६२७ | ८०६२ | ८३.७४ | ७ |
| ८ | कोल्हापूर | १७०३६ | १५८६७ | १२९८७ | ८१.८५ | ११ |
| ९ | पुणे | ११०१४ | १०६२० | ८५७१ | ८०.७१ | १२ |
| १० | सोलापूर | २५०९० | २१५५७ | १६६२१ | ७७.१० | १५ |
| | पुणे विभाग | ७५९१२ | ६८८७४ | ५६९०२ | ८२.६२ | २ |
| ११ | अहिल्यानगर | ३३२५४ | ३२२६६ | २७४३३ | ८५.०२ | ६ |
| १२ | जळगाव | २३२६९ | २०३२४ | १५८७९ | ७८.१३ | १४ |
| १३ | नंदुरबार | ४७८२ | ३७७२ | २८७६ | ७६.२५ | १६ |
| १४ | नाशिक | २८६४९ | १५४९४ | १०६०० | ६८.४१ | २८ |
| १५ | धुळे | १४७७६ | ११४२३ | ७५७९ | ६६.३५ | ३१ |
| | नाशिक विभाग | १०४७३० | ८३२७९ | ६४३६७ | ७७.२९ | ३ |
| १६ | वर्धा | ९५६९ | ८५६८ | ७४१७ | ८६.५७ | ५ |
| १७ | गोंदिया | १४४७८ | १२९७३ | १०७६१ | ८२.९५ | ८ |
| १८ | गडचिरोली | ८८८० | ७६५९ | ६३१० | ८२.३९ | १० |
| १९ | भंडारा | १५३९० | १३५२६ | १००६० | ७४.३८ | २१ |
| २० | चंद्रपूर | २६४२७ | २२८२९ | १६९११ | ७४.०८ | २२ |
| २१ | नागपूर | २१०३९ | १३४२२ | ९१२८ | ६८.०१ | ३० |
| | नागपूर विभाग | ९५७८३ | ७८९७७ | ६०५८७ | ७६.७१ | ४ |
| २२ | वाशिम | ३१८४७ | १२६७१ | १०१५६ | ८०.१५ | १३ |
| २३ | अमरावती | २३४५९ | १९७६० | १५००५ | ७५.९४ | १७ |
| २४ | यवतमाळ | २४२७८ | २०१०४ | १४६८१ | ७३.०३ | २३ |
| २५ | अकोला | २९५९२ | २७७९५ | २०१७५ | ७२.५८ | २५ |
| २६ | बुलढाणा | २८६७९ | २४२४९ | १६८६२ | ६९.५४ | २७ |
| | अमरावती विभाग | १३७८५५ | १०४५७९ | ७६८७९ | ७३.५१ | ५ |
| २७ | लातूर | ३९०४४ | ३३२५५ | २५१७० | ७५.६९ | १८ |
| २८ | बीड | ३६७३५ | ३००१२ | २२३३७ | ७४.४३ | २० |
| २९ | धाराशिव | २२५१७ | १८९७८ | १३७८४ | ७२.६३ | २४ |
| ३० | नांदेड | ३३६०० | २५२३२ | १७६०० | ६९.७५ | २६ |
| ३१ | छत्रपती संभाजी नगर | ३५९८७ | २८५९९ | १९५५७ | ६८.३८ | २९ |
| ३२ | परभणी | २८३३१ | २३३८३ | १५२८४ | ६५.३६ | ३२ |
| ३३ | हिंगोली | २२८२८ | १८०२५ | ११२६१ | ६२.४७ | ३३ |
| ३४ | जालना | ४२५७७ | ३१४२३ | १६२०५ | ५१.५७ | ३४ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | २६१६१९ | २०८९०७ | १४११९८ | ६७.५९ | ६ |
| | एकूण | ६९०७४१ | ५५७९३९ | ४११८७७ | ७३.८२ | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २९ | १००.०० | १ |
| २ | रत्नागिरी | ३४० | २५५ | २५२ | ९८.८२ | २ |
| ३ | पालघर | १४३८५ | १४३५१ | १२२४० | ८५.२९ | ७ |
| ४ | रायगड | ६६१० | ६४९६ | ५१४९ | ७९.२६ | १० |
| ५ | ठाणे | ५४३० | ५३९४ | २९२९ | ५४.३० | २७ |
| कोकण विभाग | | २६८०८ | २६५२५ | २०५९९ | ७७.६६ | १ |
| ६ | सातारा | १९७ | १९७ | १९१ | ९६.९५ | ३ |
| ७ | कोल्हापूर | ६० | २५ | २४ | ९६.०० | ४ |
| ८ | सोलापूर | ८९४ | ६९० | ६१३ | ८८.८४ | ५ |
| ९ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.०० | ६ |
| १० | पुणे | ६७३६ | ६३७६ | ४०१८ | ६३.०२ | १९ |
| पुणे विभाग | | ७९६७ | ७३३८ | ४८८९ | ६६.६३ | २ |
| ११ | गोंदिया | ५५९९ | ५५८० | ४७०५ | ८४.३२ | ९ |
| १२ | वर्धा | ५६९२ | ५६९१ | ४४३१ | ७७.८६ | ११ |
| १३ | भंडारा | ६३३६ | ६३०१ | ४६२३ | ७३.३७ | १२ |
| १४ | गडचिरोली | १०९५१ | १०६५२ | ७७३५ | ७२.६२ | १३ |
| १५ | नागपूर | १३१८८ | ११९२४ | ६३१६ | ५२.९७ | २८ |
| १६ | चंद्रपूर | २३१८२ | २१३९३ | ११९७९ | ५२.२६ | ३० |
| नागपूर विभाग | | ६४९४८ | ६१५४१ | ३८९८९ | ६३.३५ | ३ |
| १७ | अकोला | ५८१५ | ५१३९ | ३५७० | ६९.४७ | १४ |
| १८ | वाशिम | २९७० | २८१४ | १८८१ | ६६.८४ | १७ |
| १९ | यवतमाळ | १४३२२ | १४३०१ | ८८४७ | ६१.८६ | २० |
| २० | अमरावती | १५२३५ | १५१२९ | ७९३७ | ५२.४६ | २९ |
| २१ | बुलढाणा | ४१९१ | ३११८ | १५५२ | ४९.७८ | ३२ |
| अमरावती विभाग | | ४२५३३ | ४०५०१ | २३७८७ | ५८.७३ | ४ |
| २२ | अहिल्यानगर | ८९०७ | ८८५६ | ६१०४ | ६८.९३ | १५ |
| २३ | जळगाव | १४६३२ | १४४७५ | ८४०२ | ५८.०४ | २२ |
| २४ | नंदुरबार | ४७०४६ | २०९४७ | १२१३७ | ५७.९४ | २३ |
| २५ | धुळे | २५२८५ | १८७१६ | १०३९४ | ५५.५४ | २६ |
| २६ | नाशिक | ३३१५३ | २९७८९ | १४८९६ | ५०.०१ | ३१ |
| नाशिक विभाग | | १२९०२३ | ९२७८३ | ५१९३३ | ५५.९७ | ५ |
| २७ | लातूर | १५३८ | ६३८ | ५३८ | ८४.३३ | ८ |
| २८ | धाराशिव | ५४९ | ४८२ | ३२४ | ६७.२२ | १६ |
| २९ | बीड | २२३० | ११७३ | ७६६ | ६५.३० | १८ |
| ३० | हिंगोली | १८०३५ | १२७५९ | ७८८३ | ६१.७८ | २१ |
| ३१ | छत्रपती संभाजी नगर | ७७८७ | ६३१८ | ३५३५ | ५५.९५ | २४ |
| ३२ | जालना | २९५६ | १३८९ | ७७३ | ५५.६५ | २५ |
| ३३ | परभणी | ३८८७ | ३२१२ | १२६६ | ३९.४१ | ३३ |
| ३४ | नांदेड | ७९९१ | ३७२२ | १४४५ | ३८.८२ | ३४ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ४४९७३ | २९६९३ | १६५३० | ५५.६७ | ६ |
| एकूण | | ३१६२५२ | २५८३८१ | १५६७२७ | ६०.६६ | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४२१ | ९७.४५ | ९ |
| २ | जळगाव | ५७० | ५६९ | ५३५ | ९४.०२ | १५ |
| ३ | अहिल्यानगर | १९८ | १९८ | १८४ | ९२.९३ | १७ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | ११६ | ८४.६७ | २२ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०० | २९ |
| | **नाशिक विभाग** | **१३५३** | **१३३६** | **१२५६** | **९४.०१** | **१** |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६४ | १००.०० | ८ |
| ७ | अकोला | ३७३ | ३७३ | ३६२ | ९७.०५ | १० |
| ८ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५७ | ९६.२३ | १२ |
| ९ | अमरावती | ४४४ | ४४४ | ४१९ | ९४.३७ | १४ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९४ | ५१८ | ८७.२१ | २१ |
| | **अमरावती विभाग** | **१८४६** | **१८४६** | **१७२०** | **९३.१७** | **२** |
| ११ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.०० | १ |
| १२ | लातूर | १७ | १३ | १३ | १००.०० | ३ |
| १३ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००.०० | ४ |
| १४ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००.०० | ५ |
| १५ | जालना | ३८ | ३६ | ३४ | ९४.४४ | १३ |
| १६ | बीड | ९२ | ८३ | ७८ | ९३.९८ | १६ |
| १७ | छत्रपती संभाजी नगर | ५७ | ५१ | ४६ | ९०.२० | १९ |
| १८ | धाराशिव | २४७ | २४७ | २०९ | ८४.६२ | २३ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **५९२** | **५६३** | **५१३** | **९१.१२** | **३** |
| १९ | वर्धा | ५० | ५० | ५० | १००.०० | ७ |
| २० | नागपूर | ४८ | ४८ | ४४ | ९१.६७ | १८ |
| २१ | चंद्रपूर | ३५ | ३२ | २३ | ७१.८८ | २५ |
| | **नागपूर विभाग** | **१३३** | **१३०** | **११७** | **९०.००** | **४** |
| २२ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.०० | २ |
| २३ | सातारा | २४ | २४ | २४ | १००.०० | ६ |
| २४ | सोलापूर | २३१ | २०२ | १९५ | ९६.५३ | ११ |
| २५ | सांगली | ३८ | २६ | २३ | ८८.४६ | २० |
| २६ | पुणे | १८८ | १७४ | १३७ | ७८.७४ | २४ |
| | **पुणे विभाग** | **४८८** | **४३३** | **३८६** | **८९.१५** | **५** |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.०० | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.०० | ३२ |
| | **कोकण विभाग** | **३** | **०** | **०** | **०.००** | **६** |
| | **एकूण** | **४४१५** | **४३०८** | **३९९२** | **९२.६६** | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ५० | १००.०० | १ |
| २ | पालघर | ११३१ | ११२८ | ११०१ | ९७.६१ | २ |
| ३ | ठाणे | १५७८ | १५७५ | १५०६ | ९५.६२ | ३ |
| ४ | रायगड | १३९४ | १३९४ | १३३० | ९५.४१ | ४ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | १० | ९०.९१ | ६ |
| कोकण विभाग | | ४१८० | ४१५८ | ३९९७ | ९६.१३ | १ |
| ६ | गडचिरोली | १७७८ | १७५२ | १६१२ | ९२.०१ | ५ |
| ७ | चंद्रपूर | ७२३ | ६६७ | ५३७ | ८०.५१ | ८ |
| ८ | वर्धा | ३९६ | ३९६ | २८४ | ७१.७२ | १० |
| नागपूर विभाग | | २८९७ | २८१५ | २४३३ | ८६.४३ | २ |
| ९ | नांदेड | ४१९ | १८१ | १४९ | ८२.३२ | ७ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ४१९ | १८१ | १४९ | ८२.३२ | ३ |
| १० | यवतमाळ | ४७८४ | ४६७९ | ३५०८ | ७४.९७ | ९ |
| अमरावती विभाग | | ४७८४ | ४६७९ | ३५०८ | ७४.९७ | ४ |
| ११ | नाशिक | ९८ | ३७ | २३ | ६२.१६ | ११ |
| नाशिक विभाग | | ९८ | ३७ | २३ | ६२.१६ | ५ |
| १२ | पुणे | ७५ | ७१ | ३५ | ४९.३० | १२ |
| पुणे विभाग | | ७५ | ७१ | ३५ | ४९.३० | ६ |
| एकूण | | १२४५३ | ११९४१ | १०१४५ | ८४.९६ | |

# प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | No. of PVTG HHs Surveyed | Total Eligible | Total Registered | Sanctioned | Completed | % | State Rank |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | २४८ | २४८ | १९७ | १८६ | १३१ | ७०.४३ | २ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २४८ | २४८ | १९७ | १८६ | १३१ | ७०.४३ | १ |
| २ | सातारा | ८५९ | ७२५ | ६९७ | ९४ | २१ | २२.३४ | ३ |
| ३ | पुणे | २५९५ | २२०७ | १६२० | १६१ | १२ | ७.४५ | ७ |
| ४ | कोल्हापूर | २६ | २२ | २२ | ० | ० | ०.०० | १५ |
| पुणे विभाग | | ३४८० | २९५४ | २३३९ | २५५ | ३३ | १२.९४ | २ |
| ५ | रत्नागिरी | १०३४ | ६१४ | ५४३ | ४१० | ७६ | १८.५४ | ४ |
| ६ | पालघर | ७९४३ | ७५०१ | ७०६० | ६०९३ | ६६९ | १०.९८ | ५ |
| ७ | रायगड | १८३३३ | १३९५४ | १०९९१ | ७६९१ | ७७९ | १०.१३ | ६ |
| ८ | ठाणे | ८१७५ | ७९१३ | ६८३४ | ५८५२ | ६० | १.०३ | १४ |
| ९ | सिंधुदुर्ग | १७५ | ७१ | ५६ | ७ | ० | ०.०० | १६ |
| कोकण विभाग | | ३५६६० | ३००५३ | २५४८४ | २००५३ | १५८४ | ७.९० | ३ |
| १० | अमरावती | ३३ | ३० | २३ | २१ | २० | ९५.२४ | १ |
| ११ | यवतमाळ | ९०६९ | ८१६१ | ५१५९ | ४२०१ | २५५ | ६.०७ | ९ |
| अमरावती विभाग | | ९१०२ | ८१९१ | ५१८२ | ४२२२ | २७५ | ६.५१ | ४ |
| १२ | नाशिक | ३१५० | २६०९ | २२०८ | १५३५ | १०० | ६.५१ | ८ |
| १३ | अहिल्यानगर | ९१ | ८३ | ७६ | ७० | ३ | ४.२९ | ११ |
| नाशिक विभाग | | ३२४१ | २६९२ | २२८४ | १६०५ | १०३ | ६.४२ | ५ |
| १४ | वर्धा | ६८६ | ५९५ | ४३४ | २३९ | ११ | ४.६० | १० |
| १५ | चंद्रपूर | ६८९ | ४२१ | ३३२ | ३११ | १३ | ४.१८ | १२ |
| १६ | गडचिरोली | ८०१६ | ७२६९ | ६७१९ | ६४८३ | ९० | १.३९ | १३ |
| नागपूर विभाग | | ९३९१ | ८२८५ | ७४८५ | ७०३३ | ११४ | १.६२ | ६ |
| एकूण | | ६११२२ | ५२४२३ | ४२९७१ | ३३३५४ | २२४० | ६.७२ | |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम | ४१ | ४१ | ३६ | ८७.८० | २ |
| २ | बुलढाणा | ८६ | ८१ | ५५ | ६७.९० | ३ |
| अमरावती विभाग | | १२७ | १२२ | ९१ | ७४.५९ | १ |
| ३ | जळगाव | १९२ | १८७ | ७३ | ३९.०४ | ६ |
| ४ | अहिल्यानगर | १५८ | १५५ | २४ | १५.४८ | ७ |
| ५ | नंदुरबार | २ | २ | ० | ०.०० | २० |
| नाशिक विभाग | | ३५२ | ३४४ | ९७ | २८.२० | २ |
| ६ | सातारा | २७३ | २१३ | ११५ | ५३.९९ | ४ |
| ७ | कोल्हापूर | ५२५ | ५२५ | २६२ | ४९.९० | ५ |
| ८ | सोलापूर | २५९ | २५२ | १७ | ६.७५ | १० |
| ९ | पुणे | १२३६ | ० | ० | ०.०० | २२ |
| १० | सांगली | ८४४ | ४६१ | ० | ०.०० | २५ |
| पुणे विभाग | | ३१३७ | १४५१ | ३९४ | २७.१५ | ३ |
| ११ | भंडारा | २२ | २१ | १९ | ९०.४८ | १ |
| १२ | गोंदिया | १५ | १४ | १ | ७.१४ | ९ |
| १३ | वर्धा | ७४५ | ४०० | २५ | ६.२५ | ११ |
| १४ | चंद्रपूर | १९६ | ११० | ० | ०.०० | १७ |
| नागपूर विभाग | | ९७८ | ५४५ | ४५ | ८.२६ | ४ |
| १५ | लातूर | २४४५ | ९३८ | १४१ | १५.०३ | ८ |
| १६ | परभणी | ४४०३ | ३९०४ | २०५ | ५.२५ | १२ |
| १७ | जालना | ७०४८ | ५०४९ | ७७ | १.५३ | १४ |
| १८ | छत्रपती संभाजी नगर | २८५९ | ४७३ | ० | ०.०० | १५ |
| १९ | बीड | ८१२ | ० | ० | ०.०० | १६ |
| २० | नांदेड | ५ | ५ | ० | ०.०० | १९ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | १७५७२ | १०३६९ | ४२३ | ४.०८ | ५ |
| २१ | सिंधुदुर्ग | २१ | २१ | १ | ४.७६ | १३ |
| २२ | रायगड | १२ | १२ | ० | ०.०० | २३ |
| कोकण विभाग | | ३३ | ३३ | १ | ३.०३ | ६ |
| एकूण | | २२१९९ | १२८६४ | १०५१ | ८.१७ | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | १५० | ११९ | ८४ | ७०.५९ | ४ |
| कोकण विभाग | | १५० | ११९ | ८४ | ७०.५९ | १ |
| २ | अमरावती | ५०७ | ४७६ | ३३६ | ७०.५९ | ३ |
| ३ | यवतमाळ | ६१७८ | ५२५३ | २०२६ | ३८.५७ | ११ |
| ४ | वाशिम | ० | ० | ० | ०.०० | २३ |
| अमरावती विभाग | | ६६८५ | ५७२९ | २३६२ | ४१.२३ | २ |
| ५ | धुळे | १५२ | १४५ | ६७ | ४६.२१ | ७ |
| ६ | जळगाव | १०४९ | ९८६ | ३८८ | ३९.३५ | १० |
| ७ | अहिल्यानगर | २० | २० | ० | ०.०० | १९ |
| ८ | नंदुरबार | ३५ | ३१ | ० | ०.०० | २१ |
| नाशिक विभाग | | १२५६ | ११८२ | ४५५ | ३८.४९ | ३ |
| ९ | गोंदिया | ११६४ | ११२८ | ६२७ | ५५.५९ | ६ |
| १० | भंडारा | ३२८४ | ३१३९ | १४३४ | ४५.६८ | ८ |
| ११ | चंद्रपूर | ११४०८ | ९५८१ | २९९१ | ३१.२२ | १२ |
| १२ | नागपूर | ७८० | ४०५ | १४ | ३.४६ | १७ |
| १३ | वर्धा | ४०० | ३२१ | ८ | २.४९ | १८ |
| नागपूर विभाग | | १७०३६ | १४५७४ | ५०७४ | ३४.८२ | ४ |
| १४ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ६० | ९२.३१ | १ |
| १५ | सातारा | १९५ | १९५ | १७१ | ८७.६९ | २ |
| १६ | सोलापूर | १४ | १४ | ८ | ५७.१४ | ५ |
| १७ | सांगली | १०६१ | ८२५ | ३४ | ४.१२ | १६ |
| १८ | पुणे | २० | ० | ० | ०.०० | २२ |
| पुणे विभाग | | १३५५ | १०९९ | २७३ | २४.८४ | 5 |
| १९ | परभणी | ४४४ | ४३७ | १८७ | ४२.७९ | ९ |
| २० | धाराशिव | ३७७२ | २७२७ | ७३७ | २७.०३ | १३ |
| २१ | जालना | ९५११ | ८७४३ | ९१२ | १०.४३ | १४ |
| २२ | लातूर | ३९८५ | ११७८ | ९६ | ८.१५ | १५ |
| २३ | नांदेड | १ | १ | ० | ०.०० | २० |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | १७७१३ | १३०८६ | १९३२ | १४.७६ | ६ |
| एकूण | | ४४१९५ | ३५७८९ | १०१८० | २८.४४ | |

# मोदी आवास घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | १४४२९ | १४४२९ | ११२३३ | ७७.८५ | १ |
| २ | गडचिरोली | ६५४८ | ६५४८ | ४२९० | ६५.५२ | २ |
| ३ | वर्धा | ४९६५ | ४९६५ | ३२०८ | ६४.६१ | ३ |
| ४ | भंडारा | ११०३३ | ११०३३ | ५४१३ | ४९.०६ | ९ |
| ५ | चंद्रपूर | १०८७४ | १०८७४ | ५२१६ | ४७.९७ | ११ |
| ६ | नागपूर | ६७४७ | ६७४६ | ३०२४ | ४४.८३ | १२ |
| | नागपूर विभाग | ५४५९६ | ५४५९५ | ३२३८४ | ५९.३२ | १ |
| ७ | सिंधुदुर्ग | १३०८ | १३०८ | ६७८ | ५१.८३ | ६ |
| ८ | रत्नागिरी | ६३५६ | ६३५६ | ३१४९ | ४९.५४ | ८ |
| ९ | पालघर | ४५८ | ४५८ | २२० | ४८.०३ | १० |
| १० | रायगड | २४५६ | २४४० | ९०६ | ३७.१३ | १७ |
| ११ | ठाणे | २५३८ | २५३८ | ७७४ | ३०.५० | २१ |
| | कोकण विभाग | १३११६ | १३१०० | ५७२७ | ४३.७२ | २ |
| १२ | अकोला | ७३५३ | ७३५३ | ४१७४ | ५६.७७ | ५ |
| १३ | अमरावती | १४१७८ | १४१७८ | ७१८४ | ५०.६७ | ७ |
| १४ | यवतमाळ | २९९९९ | २९९९९ | १३२१० | ४४.०३ | १३ |
| १५ | वाशिम | १२४५५ | १२४५५ | ४८५७ | ३९.०० | १५ |
| १६ | बुलढाणा | १७०५५ | १७०५५ | ५३९५ | ३१.६३ | २० |
| | अमरावती विभाग | ८१०४० | ८१०४० | ३४८२० | ४२.९७ | ३ |
| १७ | सातारा | १७७७ | १७७७ | ११११ | ६२.५२ | ४ |
| १८ | सांगली | १९५८ | १९५८ | ८१४ | ४१.५७ | १४ |
| १९ | कोल्हापूर | २०३१ | २०१४ | ७४२ | ३६.८४ | १८ |
| २० | सोलापूर | ११०१९ | ११०१७ | ३१८३ | २८.८९ | २२ |
| २१ | पुणे | १५२१ | १५२१ | २८५ | १८.७४ | ३० |
| | पुणे विभाग | १८३०६ | १८२८७ | ६१३५ | ३३.५५ | ४ |
| २२ | छत्रपती संभाजी नगर | ५८१२ | ५४६० | २०६१ | ३७.७५ | १६ |
| २३ | धाराशिव | २२७४ | २२७४ | ७६९ | ३३.८२ | १९ |
| २४ | नांदेड | २३५९८ | २३५९८ | ६६५६ | २८.२१ | २३ |
| २५ | लातूर | ६३१८ | ६३१८ | १७०८ | २७.०३ | २४ |
| २६ | जालना | ८४९६ | ८३५४ | २१९६ | २६.२९ | २५ |
| २७ | परभणी | १३५९६ | १३५९६ | ३२३१ | २३.७६ | २७ |
| २८ | बीड | १६०४१ | १६०४१ | २९२१ | १८.२१ | ३१ |
| २९ | हिंगोली | ३३५४ | ३३५४ | ५८७ | १७.५० | ३२ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | ७९४८९ | ७८९९५ | २०१२९ | २५.४८ | ५ |
| ३० | अहिल्यानगर | ४३५६ | ४३३६ | ११२३ | २५.९० | २६ |
| ३१ | जळगाव | २९५३१ | २९५१६ | ५८२१ | १९.७२ | २८ |
| ३२ | नाशिक | ६९८१ | ६९८१ | १३३८ | १९.१७ | २९ |
| ३३ | नंदुरबार | २८७६ | २८७६ | ४४४ | १५.४४ | ३३ |
| ३४ | धुळे | ९७०९ | ९७०९ | १४०३ | १४.४५ | ३४ |
| | नाशिक विभाग | ५३४५३ | ५३४१८ | १०१२९ | १८.९६ | ६ |
| | एकूण | ३००००० | २९९४३५ | १०९३२४ | ३६.५१ | |

# प्रधानमंत्री आवास योजनेमुळे घरकुलाची स्वप्नपुर्ती

आंजी (मोठी) या वर्धा जिल्ह्यातील गावामध्ये श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर वास्तव्य करीत होत्या. आंजी गाव लोकसंख्येने व क्षेत्रफळाने मोठे असल्यामुळे गावात सर्वच प्रकारच्या जाती धर्माची लोक वास्तव्यास आहे. श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांच्याकडे स्वतःची जागा नसल्याने दुसऱ्याच्या जागेवर अतिक्रमण करून कच्च्या घरात राहत होत्या. घरची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने कुडा मातीच्या कच्च्या घरात राहत होत्या. पावसाळ्यात संपूर्ण घरात पाणी असायचे. मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित असल्यामुळे घर बांधणे शक्य नव्हते.



अशातच गावामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण चे सर्वेक्षण वर्ष २०१२-१३ मध्ये झाले. त्यामध्ये त्यांना घरकुल मंजुर झाले. तसेत पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल बांधकाम जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून जागा खरेदी करण्यासाठी रक्कम रु. ५०,०००/- चा लाभ मिळाला. यामधून त्यांनी गावात जागा खरेदी करून जागा खेरेदीसह सर्व कागदपत्रांची पुर्तता करून ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती, वर्धा घरकुल मंजुरी प्रस्ताव सादर केला. त्यांना घरकुल मंजूर झाले कळताच खूप आंनद झाला. त्यांनी पाहिलेले स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न आता पूर्ण होईल अशी आस लागली. घरकुल मंजूर होताच त्यांच्या बँक खाती पहिला हप्ता रक्कम रु. १५,०००/- पंचायत समिती कार्यालकडून जमा करण्यात आला.

पहिला हप्ता मिळाल्यानंतर ग्रामीण गृह निर्माण



अभियंता श्री. नितीन डेहनकर यांनी लाईन ले-आउट तयार करून घरकुल बांधकाम साहित्याबाबत माहिती दिली. श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांनी साहित्याची जुळवाजुळव केली. त्यांना मिळालेली रक्कम कमी असल्याने त्यांनी बचत गटाकडून कर्ज स्वरुपात रक्कम रु. ७५ हजार घेतले आणि चांगला गवंडी शोधून घर बांधकाम सुरु केले. बघता बघता कॉलम उभे झाले,चौकटी पूर्ण झाली. श्री.नितीन डेहनकर यांनी वेळोवेळी कामाची तपासणी व मार्गदर्शन केले. बांधकामाच्या टप्प्यानुसार पंचायत समिती कार्यालयाकडून सर्व हप्ते श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. त्यामुळे श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांचे स्वप्नातील घरकुल अत्यंत अल्प कालावधीत पूर्ण झाले.

श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांना घरकुल बांधकामाकरीता तहसील कार्यालयातून जप्त केलेली ३ ब्रास वाळू मोफत मिळालीय याकरीता त्यांनी महसुल विभागाचे आभार मानले. त्यासोबतच नरेगा विभागाकडून त्यांना ९० दिवसाचे मजुरी रक्कम रुपये २१,४२०/ - मिळाले. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) मधून शौचालयासाठी रक्कम रु. १२,०००/- प्रोत्साहनपर अनुदान मिळाले. असे एकूण रक्कम रु. १,५३,४२०/- श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांना शासनाकडून अनुदान मिळाले.

श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांनी घरकुलाचे वास्तुपूजन मोठ्या थाटात करून गृहप्रवेश केला आहे. स्वतःच्या घरात राहण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण झाले असून त्यांचा आनंद गगनाला भिडला आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मुळे माझ्या सारख्या विधवा गरीब व भूमिहीन असलेल्या अनेक लाभार्थीला घरकुलांचा लाभ मिळाला असून मी स्वतःच्या पक्क्या घरात सुखाने राहत आहे. स्वतःच्या घरामुळे नक्कीच आमच्या राहणीमानात बदल झाला आहे. याकरीता मी ग्रामपंचायत आंजी (मोठी), पंचायत समिती वर्धा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व शासनाचे मनापासून आभार मानत असल्याची प्रतिक्रिया श्रीमती प्रेमा दिलीपराव वझरकर यांनी व्यक्त केली आहे.



# महा आवास अभियानामुळे मिळाला हक्काचा पक्का निवारा

राज्यात ग्रामीण आवास योजनांच्या कामाला गती देण्यासाठी व गुणवत्ता आणण्यासाठी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दि. २० नोव्हेंबर २०२० पासून महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे कित्येक गरीब, गरजु व भूमीहीन कुटुंबांचे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. या अभियानामुळे मंगी गावातील श्रीमती शुभांगी प्रशांत कुरटर यांचेही पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे, त्यांची ही यशोगाथा.

अमरावती विभागातील यवतमाळ जिल्हा आणि राळेगांव तालुक्यातील मंगी ग्रामपंचायत आहे. तालुका मुख्यालयपासून ४५ कि.मी. तर जिल्हा मुख्यालयापासून ८७ कि.मी. अंतरावर हे गांव स्थित आहे. गावाचे एकुण क्षेत्रफळ ६५५ हेक्टर्स आहे. गावातील एकुण लोकसंख्या ८५३ इतकी असून २२६ कुटुंब गावात वास्तव्य करतात. गावात बस सेवा कार्यरत असून रेल्वे प्रवासाकरीता गावापासून १० कि.मी. अंतरावर रेल्वे स्टेशन आहे. पांढरकवडा हे मंगी गावापासून ३५ कि.मी. अंतरावर जवळचे तालुक्याचे ठिकाण आहे.

श्रीमती शुभांगी प्रशांत कुरटर ह्या मंगी गावात कुडा मातीच्या कच्च्या घरात पती, मुलगी व मुलासह राहत होत्या. त्यांच्या राहत्या घराची परिस्थिती अत्यंत वाईट म्हणजे मोडकळीस आलेल्या मातीच्या भिंती, घरावर छप्परही नीट नाही व कायम घर पडण्याची भिती अशा परिस्थितीत जीव मुठीत घेवून समस्त कुरटकर परिवार त्या घरात दिवस काढत होते. इतर लोकांचे पक्के घर पाहून त्यांनाही आपले हक्काचे पक्के घर असावे असे वाटायचे. परंतु आर्थिक अडचणीमुळे कित्येक दिवसांचे घर बांधायचे स्वप्न हे स्वप्नच राहून गेले. पण म्हणतात ना "भगवान के घर देर है|, अंधेर नही|" असच काहीतरी श्रीमती शुभांगी कुरटर यांच्या बाबतीत घडलं. महा आवास अभियान-ग्रामीण या राज्य शासनाच्या अभियानामुळे त्यांना पक्क्या घराच्या स्वप्नपुर्तीचा मार्ग मिळाला.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हे व तालुक्यांना अभियान कालावधीत घरकुलांचे उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आले. या अभियाना अंतर्गत राळेगाव तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेचे १,२८६ घरकुल बांधकामाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. अभियान कालावधीत ७२२ घरकुले पूर्ण झाली असून उर्वरीत घरकुले पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.

श्रीमती शुभांगी प्रशांत कुरटकर यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या आवास योजनेच्या पात्र लाभार्थी असून त्यांना महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत घरकुलास मंजूरी देण्यात आली. अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास अभियान-ग्रामीण मधून घरकुलाचा पहिला हप्ता विनाविलंब त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला. पहिला हप्ता मिळताच श्रीमती शुभांगी कुरटकर व त्यांच्या कुटुंबीयांनी घरकुलाच्या कामाला सुरुवात केली. बघता बघता घरकुल पूर्णत्वाकडे वाटचाल करू लागले. याकामी पंचायत समिती राळेगावच्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या घरकुलाचे सर्व हप्ते वेळेत देवून सहकार्य केले. यामुळे श्रीमती शुभांगी कुरटकर यांचे स्वप्नातील स्वतःचे हक्काचे पक्के घरकुल पूर्ण झाले.

त्यासोबतच महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत श्रीमती शुभांगी प्रशांत कुरटकर यांना जनावरांचा गोठा व वैयक्तिक शोष खड्याचा लाभ मिळाला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशनच्या माध्यमातून अंगणात छानशी परसबाग फुलविण्यात आली आहे.

स्वतःचे हक्काचे पक्के घरकुल असावे प्रत्येकाचे स्वप्न असते आणि त्या स्वप्नाला शासनाच्या महा आवास अभियान-ग्रामीणची जोड मिळाल्याने स्वप्न पूर्ण व्हायला उशीर लागत नाही याची प्रचिती आली ती श्रीमती शुभांगी प्रशांत कुरटकर यांचे अभियानात घराचे स्वप्न पूर्ण झाल्याने.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून हक्काचे पक्के घरकुल मिळाल्याबद्दल श्रीमती शुभांगी प्रशांत कुरटकर व त्यांच्या परिवाराने महा आवास अभियान-ग्रामीण राबविल्यासाठी शासनाचे आभार मानले. श्रीमती कुरटकर त्यांच्या परिवारासह त्यांना मिळालेल्या घरात निर्भयपणे व आनंदाने वास्तव्य करीत आहेत.





# महा आवास अभियानातून घरकुलासह मिळाला इतर शासकीय योजनेचा लाभ मिळाल्याने जीवनमान उंचावले

उमरखेडा हे गाव मराठवाड्यातील जालना जिल्ह्यामधील भोकरदन तालुक्यात येते. या गावामध्ये प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांना सन २०२१-२२ मध्ये महा आवास अभियानामुळे घरकुलाचा लाभ मिळाला आहे.त्यासोबतच शासकीय योजनांच्या कृती संगमामुळे इतर शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याने त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

श्री.रामेश्वर साहेबराव फुके उमरखेडा गावात जुन्या, कच्च्या व पत्राच्या घरात कुटुंबीयांसह राहत होते. पावसाळ्यात पत्रे गळायचे, हिवाळ्यात पत्रे थंड व्हायचे तर उन्हाळ्यात पत्रे तापायचे त्यासोबतच विंचू, साप व इतर विषारी जीवजंतूचीही भिती होती. यामुळे घरात वावरतांना व झोपतांना कायम भिती असायची. आपले स्वतःचे पक्के घर कधी होणार व आपण सुखाची झोप कधी घेणार ही चिंता त्यांच्या मनी कायम असायची.

अशातच राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना यासह पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात महाआवास अभियान २०२१-२२ राबविण्यात आले. या अभियानामुळे श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांना प्रधानमंत्री आवास योजेना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाले. त्यांना याविषयी ग्रामसेवक व सरपंच यांनी संपर्क साधून योजनेची व आवश्यक कागदपत्रांची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांनी कागदपत्रांची पूर्तता करून दिली. अभियानामुळे त्यांच्या बँक खात्यावर विनाविलंब काम सुरु करण्यासाठी रक्कम रू.१५,०००/- पहिला हप्ता जमा झाला. त्यामधून त्यांनी बांधकाम साहित्य खरेदी करून घरकुल बांधकामास सुरुवात केली. त्यानंतर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी मुल्यमापन केल्यानंतर दुसरा हप्ता रक्कम रु. ४५,०००/- त्यांच्या बँक खात्यावर Direct Beneficiary Transfer द्वारे जमा करण्यात आला. ह्या दरम्यान त्यांनी स्वतः सुद्धा त्यांच्या कडील पुर्वीची काही बचत व मित्र-नातेवाईक यांचेकडून बाकी पैसे जमा करुन त्यांना हवे तसे घराचे बांधकाम केले. त्यानंतर तिसरा हप्ता हा Slab लेव्हलला रक्कम रु.४०,००० /- त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला. तसेच शौचालयासह घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्यांच्या बँक खात्यावर चौथा हप्ता रक्कम रू.२०,०००/- जमा करण्यात आला. त्यांना बांधकामाच्या टप्प्यानुसार शासनाकडून एकुण रक्कम रू.१,२०,०००/- अर्थसहाय्य मिळाले. त्यामुळे घरकुलाचे काम जलदगतीने व गुणवत्तापूर्ण झाले. घरकुल बांधकाम करतांना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वेळोवेळी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या या मोलाच्या सहकार्यामुळे श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले असून त्यांचे कुटुंब बिनधास्तपणे व आनंदाने घरात वास्तव्य करीत आहे.

महा आवास अभियानामध्ये विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून योजनांचा लाभ देण्याचा महत्वाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांना फायदा झाला असून त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, उज्वला योजनेमधून गॅस, जल जीवन मिशन मधून पिण्याच्या पाण्यासाठी नळ कनेक्शन, इत्यादी योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांनी बांधलेले घरकुल संपूर्ण तालुक्यात आदर्श ठरले असून त्यांचे कुटुंब गुण्यागोविंदाने या आदर्श घरकुलात आपले संसार करीत आहे.





# गृह संकुल उभारणीमुळे झोपडीतून पक्क्या घरात गृहप्रवेश

नांदगाव तालुका व जिल्हा अहमदनगर हे गाव अहमदनगर पासून २५ कि.मी. अंतरावर असून सन २०११ च्या जनगणने नुसार या गावाची एकूण लोकसंख्या ३,२३७ आहे. मुख्यालयाच्या शेजारी असलेल्या यागावात विविध समाजाची २५० कुटुंबे अंदाजे ६५० लोक झोपड्यात, पत्राचे शेड व दगड मातीच्या कच्च्या घरात राहत होते. राहत असलेल्या ठिकाणी कोणत्याही मुलभूत नागरी सुविधा नसल्याने या लोकांना पावसाळ्यात प्रचंड हाल अपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. पावसाळ्यात या लोकांना गावातील मंदिर, चावडी, शाळा व समाज मंदिरात आश्रय घेण्याशिवाय पर्याय नव्हता. ही सर्व लोक शेतमजुरी, बांधकाम मजुरी, ऊसतोड, व औद्योगिक वसाहत येथे मजुरीची कामे करून त्यांचा उदरनिर्वाह चालवत होती.

इतरांप्रमाणे आपलेही स्वतःचे पक्के घरकुल असावे यासाठी या सर्वांनी ग्रामपंचायतीकडे घरकुलाची मागणी केली. विविध समाजातील लाभार्थ्यांनी केलेली घरकुलांची मागणी पूर्ण करण्यासाठी त्यांच्या वस्तीमध्ये जाऊन ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी व कर्मचारी यांनी बैठक घेतली. त्यांना केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनेबाबत सविस्तर माहिती दिली. या समाजातील काही लाभार्थी कामाकरीता, ऊसतोडी व वीटभट्टी कामासाठी स्थलांतरीत झाले होते. या सर्व लाभार्थ्यांना एकत्र करून योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली. तसेच त्यांच्या कागदपत्र पुर्ततेसाठी कागदपत्र मेळावा घेवून कागदपत्रांची पुर्तता करून त्यांचा घरकुल मागणी प्रस्ताव तयार करण्यात आला.

परंतु या लाभार्थ्यांकडे स्वतः ची जागा नसल्यामुळे पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेमधून अर्थसहाय्य मिळणेबाबचा प्रस्ताव नांदगाव ग्रामपंचायतीने पंचायत समिती अहमदनगरचे गटविकास अधिकारी यांना दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी सादर केला. त्यानुसार पंडित दीनदयाळ घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून २९ लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रू.४४,०८०/- प्रमाणे एकुण रक्कम रू.१२,७८,३२०/- व १० लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रू.४४,१३०/- प्रमाणे एकुण रक्कम रू.४,४१,३००/- लाभ देण्यात आला.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ४० लाभार्थ्यांना रक्कम रू.१,२०,०००/- प्रमाणे अनुदान देण्यात आले.तसेच विविध शासकीय योजनांच्या कृती संगमातून या लाभार्थ्यांना स्वच्छ भारत मिशन मधून प्रत्येकी रू.१२,०००/- शौचालयासाठी प्रोत्साहनपर अनुदान, ४० कुटुंबातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ४ महिला स्वयंसहायता बचत गटांची स्थापना, १५ वा वित्त आयोगामधून अंतर्गत रस्ते, पेव्हिंगब्लॉक्स बसविण्यात आले. आयडीबीआय बँक, अहमदनगर यांच्या सी.एस.आर. निधीतून ४० सिलिंग फॅन, मेरापथ एज्युकेशन लिमिटेड, अहमदनगर यांच्या सी.एस.आर. निधीतून स्ट्रीट लाईट फिटिंगची कामे पूर्ण करण्यात आली. त्याचप्रमाणे घरकुलांना रंगरंगोटी व वृक्षारोपण ग्रामपंचातीने केले.

अशाप्रकारे केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना, सी.एस.आर. निधी, विविध योजनांच्या कृती संगमातून ४० घरकुलांचे बांधकामे पूर्ण करून सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून सुंदर गृहसंकुलाची उभारणी करण्यात आली आहे.

येत्या कालावधीत लहान मुलांसाठी अंगणवाडी, प्राथमिक शाळा, सामाजिक सभागृह, उद्यान व खेळ साहित्यासह क्रीडांगण, विरंगुळा केंद्र, पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी टाकी व जोड रस्ता, इ. कामे करण्याचे प्रस्तावीत आहे. या गृहसंकुलामुळे या सर्व लाभार्थ्यांची भटकंती थाबून त्यांना हक्काचा पक्का निवारा मिळाला आहे. त्यासोबतच विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून मुलभूत नागरी सुविधासह रोजगार मिळाल्याने त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. या गृहसंकुलात ही सर्व कुटुंब आनंदाने वास्तव्य करीत असून याकरीता त्यांनी शासनाचे आभार मानले आहे.





# दरड प्रवण क्षेत्रातील लाभार्थ्यांना गृह संकुल उभारणीतून सुरक्षित निवारा

कुशिरे बुद्रुक ग्रामपंचायत पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात आहे. या गावची एकुण लोकसंख्या १,१५८ असून या गावात एकुण १३ घरकुल लाभार्थी आहेत. **गोहिरी नदी, श्री.भैरवनाथ मंदीर, श्री. क्षेत्र भिमाशंकर अभयआरण्य** व **डिंभे धरण**, इत्यादी प्रसिध्द स्थळे कुशिरे बुद्रुक गावाजवळ आहेत.

ग्रामपंचायत कुशिरे बुद्रुक अंतर्गत मेघोली हे गाव संभाव्य दरड प्रवण क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे या गावाचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करणे आवश्यक होते.परंतू जागे अभावी पुनर्वसन करणे शक्य नव्हते. मेघोली येथील ग्रामस्थ श्री.अशोक बबन शेंगाळे यांनी विनामोबदला ७२ गुंठे जागा या गावातील लाभार्थ्यांकरीता उपलब्ध करुन दिली. या आदिवासी लाभार्थ्यांसाठी शबरी आवास योजने मधून १३ घरकुलांना मंजूरी देवून त्यांना सुरक्षित जागेत घरकुल हलविण्यात आले. या १३ लाभार्थ्यांकडे पैशाची अडचण असल्यामुळे या लाभार्थ्यांना गृह संकुल उभारणी पर्याया बाबत मार्गदर्शन करून त्यांच्याकरीता गृह संकुल उभारण्याचे निश्चित केले.

मेघोली हे गाव अतीवृष्टी क्षेत्रात येत असल्याने येथे मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. घरकुल बांधकाम करण्यासाठी आवश्यक वाळू, विटा, सिमेंट, पत्रे, लोखंड व इत्तर बांधकाम साहित्य घोडेगाव येथून साधारण ५० कि.मी. अंतरावरुन आणावे लागते. बांधकाम साहित्य आणण्यासाठी स्थानिक विकास निधीतून जांभोरी ते मेघोली गावापर्यंत पक्का रस्ता बांधण्यात आला. ज्यामुळे बांधकाम साहित्याची उपलब्धता झाली. या सर्व लाभार्थ्यांना घरकुल मंजुर होता पहिला हप्ता विनाविलंब त्यांच्या बँक खाती जमा करण्यात आला. या सर्व १३ लाभार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या एकत्रित रक्कमेतून बांधकाम साहित्याची खरेदी करून गृह संकुल बांधकामास सुरूवात केली. बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांना सर्व हप्ते वितरीत करण्यात आले. त्यामुळे या १३ लाभार्थ्यांच्या गृह संकुलाचे काम अत्यंत जलदगतीने पूर्ण झाले. या सर्व लाभार्थ्यांचा गृहप्रवेश कार्यक्रम करण्यात आला असून या गृह संकुलामध्ये १३ कुटुंबे कुटुंब प्रमुखासह ९० लहान मोठ्या व्यक्ती आनंदाने वास्तव्य करीत आहेत. या गृह संकुला जवळ महिला व बालकल्याण विभागामार्फत अंगणवाडी इमारत बांधण्यात आल्याने लहान मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे.तसेच लोकसहभागातून अंतर्गत रस्ते व वाडीच्या हद्दीलगत वृक्षारोपण करण्यात आले आहे. सांडपाणी व्यवस्थापन करणेसाठी रोजगार हमी योजनेमधून शोषखड्डे बांधण्यात आले असून या शोषखड्ड्यासाठी नाम फाऊंडेशन मार्फत मोफत प्लास्टीक टाक्या देण्यात आल्या आहेत. घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली असून ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग निधीतून जैवीक खत खड्डा व कचरा संकलन कुंडी बसविण्यात आलेली आहे.

या गृह संकुलाला रस्ते, पथ दिवे, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, इ. मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच या सर्व लाभार्थ्यांना अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, जल जीवन मिशन मधून नळ जोडणी, प्रधानमंत्री उज्ज्वल योजने मधून गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजिविकेचे साधन व महाराष्ट्र उर्जा विकास अभिसरण (महाउर्जा) मधून उर्जेच्या बचतीची साधनं, इ. लाभ देण्यात आला. यामुळे लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावले असून सर्व लाभार्थी आपल्या कुटुंबासह आनंदाने वास्तव्य करीत आहेत.

दरड प्रवण क्षेत्रातून सुरक्षित ठिकाणी गृह संकुलाच्या माध्यमातून हक्काचा पक्का निवारा दिल्यावद्दल या सर्व १३ लाभार्थ्यांनी मेघोली येथील ग्रामस्थ श्री.अशोक बबन शेंगाळे यांच्यासह ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा स्तरावरील सर्व यंत्रणेचे आभार मानले आहे.





# शासकीय यंत्रणेच्या समन्वयातून पुर्नवसीत लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ

**आखवणे-भोम हे गाव कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वैभववाडी तालुक्यात असून** हे गांव अरुणा प्रकल्पाअंतर्गत बुडित क्षेत्रात जात असल्याने सदर लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभ देता येईल अगर कसे याबाबत संभ्रम निर्माण होता.त्याकरीता पंचायत समिती कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेशी वारंवार पत्रव्यहार करुन सदर लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभ मिळणेबाबत विनंती केली. त्यानुसार या गावातील एकुण ७० लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत निश्चित झाले.

सन २०११ च्या ब यादीतील आखवणे-भोम गावात प्रधानमंत्री आवास घरकुल योजना-ग्रामीण अंतर्गत एकुण ७० घरकुले प्रतिक्षा यादीत होती. त्यापैकी प्रथम २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये ६ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आणि या सर्व घरकुलांचे बांधकामही पूर्ण झाले आहे. त्यानंतर आखवणे-भोम गावांचे पुनर्वसन झाल्याने त्यांना मांगवली, कुसुर, उंबर्डे व किंजळीचा माळ-हेत या ठिकाणी हलविण्यात आले. त्यामुळे या सर्व घरकुल लाभार्थ्यांवर मिळालेल्या भुखंडावर पत्र्याच्या शेडमध्ये राहण्याची वेळ आली. सन २०१९-२० मध्ये ७० पैकी ५० लाभार्थ्यांची घरकुले मंजुर झाली.

सिंधुदुर्ग जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली या सर्व घरकुल मंजुर लाभार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात त्यांना घरकुल मंजुर झाल्यापासून मिळणारे अनुदान, बांधकामाचे टप्पे व घरकुल बांधकाम संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी मिळाली, परंतु पुनर्वसन विभागाकडुन या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे पुनर्वसन अधिकारी व या सर्व लाभार्थ्यांची एकत्रित बैठक आयोजित करून घरकुल मंजुर झालेल्या लाभार्थ्यांना प्राधान्याने जागा वाटप करणेबाबत पुनर्वसन अधिकारी यांना विनंती केली.

पुनर्वसन अधिकारी यांनी या सर्व लाभार्थ्यांची जागेची अडचण लक्षात घेवून शासनाकडुन त्वरीत प्लॉट वाटप करण्यात आले. या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध होताच या सर्व लाभार्थ्यांचे घरकुल भूमिपूजन एकाच दिवशी गट विकास अधिकारी यांच्यावतीने आयोजित करून तात्काळ घरकुल बांधकामास सुरूवात करण्यात आली.तसेच या सर्व लाभार्थ्यांच्या बँक खाती पहिला हप्ता पंचायत समिती कार्यालयाकडून जमा करण्यात आला.



या सर्व लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाचे कामे अतिशय जलदगतीने पूर्ण केली असून अद्यापपर्यंत ५० पैकी ४८ घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहे. उर्वरीत २ घरकुलांचे काम प्रगतीत असून लवकरच पूर्ण होणार आहेत. तसेच उर्वरीत घरकुल लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हास्तरावर पाठविण्यात आले असून घरकुल मंजूरीची कार्यवाही प्रगतीत आहे. पूर्ण झालेल्या घरकुलांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण प्रमाणेच रमाई आवास योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेली ७ घरकुलांचे काम सुध्दा पूर्ण झाले आहे. या लाभार्थ्यांना पुनर्वसन विभाग तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजने अंतर्गत मिळालेल्या रक्कमेतून घरकुलांचे बांधकाम मजबुत व दर्जेदार केले आहे. यामुळे त्यांची भविष्यात घराबाबतची चिंता दुर झाली असून अतिशय सुंदर अशा घरांची निर्मिती या लाभार्थ्यांनी केली आहे. हे सर्व लाभार्थी या घरकुलांमध्ये गुण्यागोविंदाने व सन्मानाने वास्तव्य करीत आहेत.


















titude: 16.053653
ngitude: 73.683687
evation: 17.06±3 m
curacy: 3.8 m
me: 01-25-2025 17:03
ote: jaynad Bhachadra parab



[ UNION MINISTER INFORMS ]

# Centre approves 20 lakh houses for Maharashtra under PMAY scheme

So far, 26 lakh people have registered, and 20 lakh will be given houses: Maharashtra CM Fadnavis

HT Correspondent
puneletters@hindustantimes.com



Speaking to reporters in Pune, Fadnavis described the central government initiative as "historic. HT PHOTO

**PUNE:** The Central Government has allocated an additional 13 lakh houses for Maharashtra this year, totalling over 20 lakh homes in a year under the PMAY, according to Union Agriculture Minister Shivraj Singh Chouhan, who was in the city on Monday.

Maharashtra Chief Minister Devendra Fadnavis thanked Centre and Chouhan for approving an additional 13 lakh houses for the state, terming it as the highest for any state.

Speaking to reporters in Pune, Fadnavis described the initiative as "historic," stating that 26 lakh people have registered for the scheme, of whom 20 lakh will be provided houses.

"Under the Pradhan Mantri Awas Yojana, this year the Central Government approved six and a half lakh houses, with plans to increase the allocation by another 13 lakh houses for the state. This is a significant gift to Maharashtra from the Central Government. So far, 26 lakh people have registered, and 20 lakh will be given houses. This is a historic achievement," the CM said.

Fadnavis also shared a letter from Union Agriculture Minister Shivraj Singh Chouhan on X (formerly Twitter), expressing his appreciation: "Heartfelt thanks to Prime Minister Narendra Modi ji and Union Minister Shivraj Singh Chouhan ji for approving 20 lakh new houses for Maharashtra under the Pradhan Mantri Awas Yojana!"

In the letter, Chouhan described the move as a step towards fulfilling the Government of India's commitment to "Housing for All" in rural areas.

"As you are aware, the Ministry of Rural Development is implementing the Pradhan Mantri Awas Yojana-Gramin (PMAY-G), a flagship scheme of the Government of India effective from 1 April 2016. Its objective is 'Housing for All' in rural areas, assisting eligible households to construct pucca houses with basic amenities. For FY 2024-25, a target of 6,37,089 houses was allocated to your state based on the finalised Awaas+ 2018 survey lists," the letter stated.

Chouhan added: "I am pleased to inform you that the

FOR FY 2024-25, A TARGET OF 637,089 HOUSES WAS ALLOCATED TO MAHARASHTRA, CHAUHAN SAID

Ministry of Rural Development has approved an additional target of 13,29,678 houses for Maharashtra during FY 2024-25 under the PMAY-G, based on the Awaas+ 2018 survey. This brings the cumulative target for FY 2024-25 to 19,66,767 houses for the state. This is a significant step towards achieving the Government of India's commitment to 'Housing for All' in rural areas."

The Union Minister also reaffirmed the Ministry's dedication to ensuring the scheme's successful implementation in Maharashtra.

Speaking to reporters, Chouhan said, "More than 13 lakh pucca houses are being provided in Maharashtra. Two crore pucca houses will be built in villages and one crore in cities. In Maharashtra, over six lakh permanent houses have already been provided, and more than 13 lakh additional houses are now being sanctioned."

(With agency inputs)

# आवास योजनेंतर्गत राज्यात २० लाख पक्की घरे

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'पंतप्रधान आवास ग्रामीण प्लस योजनेंतर्गत राज्यात एकूण १९ लाख ६६ हजार ७६७ पक्की घरे देण्यात येणार आहेत,' अशी घोषणा केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री, तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्यात ६ लाख ३७ हजार ८९ पक्की घरे देण्यात येणार आहेत. त्यामुळे नव्याने १३ लाख २९ हजार ६७८ पक्की घरे देण्यात येतील, असे चौहान यांनी सांगितले.

भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर), कृषी तंत्रज्ञान उपयोजन संशोधन संस्थेच्या (अटारी) किसान सन्मान दिनानिमित्त शेतकरी, तसेच ग्रामीण विकास लाभार्थी संमेलनाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. त्या वेळी चौहान यांनी घोषणा केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी संशोधन परिषदेचे सहायक महासंचालक डॉ. संजय कुमार सिंह, राज्याचे ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. आर. गडाख या वेळी उपस्थित होते.

'पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बेघरांसाठी ६ लाख ३६ हजार ८९ पक्की घरे उपलब्ध करून दिली आहेत. या योजनेतील काही निकषांमुळे गरीब आणि बेघरांना घरे मिळत नव्हती. त्यामुळे पात्रतेचे निकष शिथिल करण्यात आले असून, पंतप्रधान आवास प्लस योजनेत यंदा महाराष्ट्रासाठी १३ लाख २९ हजार ६७८ घरे अशी एकूण सुमारे २० लाख घरे उपलब्ध करून दिली जातील,' असे चौहान यांनी जाहीर केले.

### कृषी आणि विज्ञानाची सांगड आवश्यक - फडणवीस

'कृषी क्षेत्रात शाश्वतता आणण्यासाठी कृषी आणि विज्ञानाची सांगड घालावी लागेल,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. 'जग नैसर्गिक शेतीकडे वळत आहे. नैसर्गिक बाबींचा वापर करून उत्पादकता कशी वाढविता येईल, याचा विचार करावा लागेल. राज्याने नैसर्गिक शेतीचे अभियान स्वीकारले असून, २५ लाख हेक्टर शेती नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत,' असे फडणवीस यांनी सांगितले.



### आता कुणाला घरे मिळणार?

- दूरध्वनी आणि दुचाकी असलेल्यांनाही घर मिळणार
- कुटुंबाचे मासिक उत्पन्न १० हजार रुपयांवरून पंधरा हजारांवर नेण्यात आले आहे.
- कोरडवाहू शेती आणि अडीच एकर बागायती शेती असलेल्यांनाही योजना लागू.



# महाराष्ट्रातील गरीबांसाठी २० लाख घरे देणार

केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांची घोषणा



पुणे : माझा महाराष्ट्राशी निकटचा संबंध आहे. मी महाराष्ट्राचा जावई आहे. मी ग्राम विकास मंत्री देखील आहे असे सांगत, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी १९ लाख ६६ हजार घरे यावर्षी देण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली. देशातील कोणत्याही राज्यापेक्षा ही संख्या जास्त आहे. आतापर्यंत एका राज्याला एका वर्षात मिळालेली ही सर्वाधिक घरे आहेत अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली.

भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर) कृषी तंत्रज्ञान उपयोजन संशोधन संस्था अर्थात अटारी, शिवाजीनगर येथे किसान सन्मान दिवसानिमित्ताने शेतकरी तसेच ग्रामीण विकास लाभार्थी संमेलनात ते बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आयसीएआर, नवी दिल्लीचे सहायक महासंचालक डॉ. संजय कुमार सिंह, राज्याचे ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. आर. गडाख आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री चौहान पुढे म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ... वंचित राहणार नाही, प्रत्येकाला पक्के घर मिळाले पाहिजे असा संकल्प केला आहे. हा संकल्प आमचे सरकार लवकरच पूर्ण करणार आहे. याचाच एक भाग म्हणून, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण प्लस अंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्रात ६ लाख ३७ हजार ८९ पक्की घरे देण्यात येत आहेत. आता पुन्हा नव्याने १३ लाख २९ हजार ६७८ पक्की घरे देण्यात येतील ... ७६७ घरे देण्याची घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कार्यक्रमात केली. यामुळे महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वात जास्त पक्की घरे निर्माण करणारे राज्य ठरेल. या संदर्भातील पत्र केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना कार्यक्रमाप्रसंगी दिले.

ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत ...

### कृषी आणि विज्ञानाची सांगड घालणे महत्त्वाचे - देवेंद्र फडणवीस

कृषी क्षेत्रात शाश्वतता आणण्याकरिता कृषी आणि विज्ञानाची सांगड घालणे अत्यंत महत्वाचे आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कृषीमधील पारंपरिक विज्ञानदेखील अत्यंत महत्वाचे आहे. आज पुन्हा संपूर्ण जग नैसर्गिक शेतीकडे वळताना दिसत आहे. नैसर्गिक बाबींचा वापर अधिकाधिक करून उत्पादकता कशी वाढवता येईल तसेच खाद्यामध्ये विषयुक्त पदार्थांचा वापर कसा कमी करता येईल यावे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्राने देखील नैसर्गिक शेतीचे अभियान स्वीकारले असून २५ लाख हेक्टर शेती नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे फडणवीस म्हणाले.

केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांचे जीवनमान बदलण्यासाठी व त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यासाठी विविध नवीन योजना सुरू केल्या आहेत. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या संस्थांतर्गत कर्जात पूर्वीच्या तुलनेत मोठी वाढ झाली असून ७ लाख कोटी रुपयांवरुन २५ लाख कोटी रुपये पीक कर्ज मिळत आहे. देशाच्या अर्थसंकल्पात कृषी विभागाच्या तरतुदीत १ लाख २७ हजार कोटी रुपये इतकी मोठी वाढ करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षात अन्नधान्याच्या किमान आधारभूत किमतीत दुप्पट वाढ करण्यात आली असून मोठ्या प्रमाणात खरेदी देखील करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक असून रासायनिक खतांचा वापर कमी करावा, असे आवाहन चौहान यांनी केले.

महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना यशस्वी झाली असून देशात लखपती दीदी योजनेंतर्गत तीन कोटी महिलांना लखपती दीदी करण्यात येणार आहे. या महिलांनाही प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळावा यासाठी कमाल उत्पन्नाची अट १० हजारांवरून १५ हजार रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच अडीच एकर बागायती किंवा पाच एकरपर्यंत कोरडवाहू जमीन असलेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे ...

# 20 लाख लोगों को मिलेगा घर

PM आवास योजना के तहत मिलेंगे पक्के मकान, केंद्रीय मंत्री चौहान ने दी सीएम फडणवीस को जानकारी

■ पुणे, नवभारत न्यूज नेटवर्क. प्रधानमंत्री आवास योजना के तहत साढ़े छह लाख मकान स्वीकृत किये गये थे. अब इस लक्ष्य और बढ़ा दिया गया है. केंद्र सरकार ने महाराष्ट्र के लिए 13 लाख घरों को मंजूरी दी है. साथ ही राज्य सरकार ने एक साल में 20 लाख मकान देने की घोषणा की है. राज्य के 26 लाख परिवार पंजीकृत हैं. उसमें से 20 लाख परिवारों को उनका हक का घर मिलेगा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने बताया कि सरकार अगले साल बचे हुए परिवारों को घर मुहैया कराने की कोशिश कर रही है. पुणे में किसान सम्मान दिवस के मौके पर आयोजित एक कार्यक्रम के बाद फडणवीस ने पत्रकारों से बातचीत की. वह उस समय बात कर रहे थे. राष्ट्रवादी कांग्रेस का खुद वरिष्ठ नेता छगन भुजबल को कैबिनेट में न लेकर उन्हें बाहर करने का कोई इरादा नहीं था. भुजबल से अलग राय सिर्फ उपमुख्यमंत्री अजीत पवार की थी. अगर भुजबल जैसा नेता हमारे साथ मैदान में हो तो उनका मसला सलझ जाएगा. यह विश्वास फडणवीस ने जताया. हम तीनों दल महायुति के रूप में एकजुट हैं. हम मिलकर निर्णय लेना लेते हैं. फडणवीस ने यह भी स्पष्ट किया कि भुजबल के भाजपा में शामिल होने का कोई सवाल ही नहीं है. भजबल महायति के प्रमख नेता हैं.

### लाड़की बहनों को अगले सप्ताह धनलाभ



फडणवीस ने यह भी कहा कि पालकमंत्री पद के लिए कोई प्रतिस्पर्धा नहीं है. हमारी तीनों पार्टियों के चुनिंदा नेता एक साथ बैठेंगे और फैसला करेंगे. फडणवीस ने यह भी कहा कि अगले सात से आठ दिनों में मुख्यमंत्री माझी लाडकी बहिन का पैसा महिलाओं के खाते में बहिण योजना आवंटित की जाएगी.

### भुजबल जैसे नेता को राष्ट्रीय स्तर पर भेजेंगे

तीनों दलों के नेता उनके प्रति सम्मान का भाव रखते हैं. महायुति की जीत में भी उनकी अहम भूमिका रही है. यहां तक कि खुद अजित पवार को भी उनकी चिंता है. असल में जब अजीत पवार ने भुजबल को कैबिनेट में शामिल नहीं किया तो उनका इरादा भुजबल को हटाने का भी नहीं था. हमारी पार्टी राष्ट्रीय पार्टी बनी हुई है. हम इसे राष्ट्रीय स्तर पर बढ़ाना चाहते हैं. फडणवीस ने कहा कि अजीत पवार ने मुझसे कहा कि हम भुजबल जैसे नेता को राष्ट्रीय स्तर पर भेजना चाहते हैं, जिनकी देश के अन्य राज्यों में भी पहचान हो.

Lokmat

#Lokmatnews #PMawasyojana #maharashtra #marathinews




प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# 'पीएम आवास'मधून राज्याला १९ लाख ६६ हजार घरांची भेट

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची पुण्यात घोषणा

- महाराष्ट्र सर्वांत जास्त पक्की घरे निर्माण करणारे राज्य
- दुचाकी आणि टेलिफोन असणाऱ्यांनाही घरे
- १५ हजार रुपये मासिक उत्पन्न, पाच एकरपेक्षा जास्त बागायती जमीन असणारेही लाभार्थी



पुणे : प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थी शांताबाई जगदाळे यांना घरकुलाची चावी देताना केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील व उपस्थित मान्यवर.

पुणे : पुढारी वृत्तसेवा

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या ग्रामीण प्लस योजनेंतर्गत महाराष्ट्राला प्रथम सहा लाख ३७ हजार ८९ पक्की घरे मंजूर करण्यात आली आहेत. आता त्याशिवाय अतिरिक्त १३ लाख २९ हजार ६७८ पक्की घरे देण्यात येतील. त्यामुळे चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्रात एकूण १९ लाख ६६ हजार ७६७ पक्की घरे मिळणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्राम विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सोमवारी येथे केली.

माजी पंतप्रधान स्व. चौधरी चरण सिंग यांचा २३ डिसेंबर हा जन्मदिवस दरवर्षी किसान दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून येथील कृषी महाविद्यालयाच्या परिसरातील केंद्र सरकारच्या भारतीय कृषी अनुसंधान पान ४ वर ▶

### किसान सन्मानमधून शेतकऱ्यांना १५ हजार रुपये : मुख्यमंत्री

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत केंद्राचे सहा हजार रुपये आणि राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान योजनेतून त्यात सहा हजार रुपयांची भर घालून प्रतिवर्षी १२ हजार रुपये देण्यास सुरुवात केली. लवकरच त्यामध्ये वाढ करून एकूण १५ हजार रुपये शेतकऱ्यांना देणार असल्याची माहिती या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

Sangli Edition

# घरकुलांमुळे उघडली लाभार्थ्यांच्या स्वप्नांची दारे !

उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण बांधकामामुळे माणगाव तालुका राज्यात ठरतोय अग्रेसर





जिल्ह्यात ७०६ घरकुले

माणगाव तालुक्यात ३२९ घरे

# रमाई आवास योजनेचा लाभ घेण्याचे शिराळा पंचायत समितीकडून आवाहन

बंधुता न्यूज नेटवर्क

शिराळा : अनुसुचित जातीच्या (डउ) बेघर/कच्चे घर असणाऱ्या कुटुंबांना रमाई आवास योजना महाराष्ट्र शासनामार्फत राबविली जाते. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन शिराळा पंचायतीचे गटविकास अधिकारी प्रकाश पोळ यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनामार्फत विविध घरकुल योजना राबविण्यात येतात. त्यापैकी रमाई आवास योजना ही अनुसूचित जातीच्या (डउ) बेघर कुटुंबातील नागरिकांसाठी राबविली जाणारी महत्वाकांक्षी योजना आहे. जिल्हा परिषद सांगली अंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व पंचायत समिती शिराळा मार्फत ही योजना राबविण्यात येते. या योजनेतील पात्र लाभार्थीना जिल्हास्तरीय समिती मार्फत मान्यता दिली जाते. जिल्हास्तरीय समिती पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली असून त्यांच्या मार्फत निवडीला अंतिम मंजुरी दिली जाते. रमाई आवास योजनेसाठी शिराळा तालुक्याला ७५ घरकुलांचे उद्दिष्ट असून पात्र लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात प्रस्ताव सादर करावे. यामध्ये प्रथम अर्ज देणाऱ्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

रमाई आवास योजनेमध्ये शासनाने विविध पात्रता निकष ठरवले आहेत. १) अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र, २) रेशन कार्ड, ३) १.२० लक्ष पर्यंतचा उत्पन्न दाखला, ४) स्वतःच्या नावे किंवा वडिलोपार्जित जागा असणे गरजेचे आहे. याप्रमाणे शासनाने निकष ठरविले आहेत. याबाबत अधिक माहितीसाठी पात्र लाभार्थीनी आपल्या ग्रामपंचायतींना भेट द्यावी असे आवाहन पंचायत समितीकडून करण्यात आले आहे.

# 'प्रधानमंत्री आवास'च्या १७५ पत्रांचे वाटप

ज्ञानदेव मडके : 'मुक्त वसाहत'ची ६७, होळकर योजनेतून १८ घरकुले

■ सकाळ वृत्तसेवा

मिरज, ता. २५ : तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत टप्पा क्रमांक दोन मधील १७५ लाभार्थ्यांना मंजूर पत्रांचे वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत टप्पा क्रमांक दोन मधील १७५, 'रमाई आवास'ची २७, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनाची ६७ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनाची १८ घरकुले मंजूर करण्यात आल्याची माहिती प्रभारी गटविकास अधिकारी ज्ञानदेव मडके यांनी दिली. प्रभारी गटविकास अधिकारी ज्ञानदेव मडके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

घरकुल बांधकामांप्रमाणे मिळणाऱ्या अनुदानाबाबत, अन्य योजनेंतर्गत मिळणाऱ्या स्वच्छ भारत अभियान व 'एमआरईजीएस' विभागाची माहिती देण्यात आली. पंचायत समिती आवारातील डेमोहाऊसची पाहणी करून तसे घरकुल सुरू करण्यासाठी लाभार्थ्यांना आवाहन करण्यात आले.

पंचायत समितीकडील विस्तार अधिकारी संतोष इंगळे, विस्तार अधिकारी कृषी श्रद्धा पवार बैठकीस उपस्थित होते. अंकली, आरग, एरंडोली, निलजी बामणी, बामणोली, बेडग, बेळंकी, बिसूर, भोसे; दुपारच्या सत्रात बोलवाड, बुधगाव, चाबुकस्वारवाडी, ढवळी, डोंगरवाडी, दुधगाव, गुंडेवाडी, जानराववाडी, जुनीधामणी, काकडवाडी, कळंबी, कानडवाडी, कर्नाळ, करोली (एम), कसबेडिग्रज, कवलापूर, कवठेपिरान, कावजीखोतवाडी, खंडेराजुरी, कांचनपूर, खटाव, लक्ष्मीवाडी, लिंगनूर, माधवनगर, म्हैसाळ, मालगाव, मल्लेवाडी, माळवाडी, मानमोडी, मौजे डिग्रज, नांद्रे, नरवाड, पद्माळे, पायाप्पाचीवाडी, पाटगाव, सलगरे, समडोळी, सावळी, सावळवाडी, शिंदेवाडी, शिपूर, सिद्धेवाडी, सोनी, टाकळी, तानंग, तुंग, वड्डी, विजयनगर या गावातील लाभार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंता ऋषभ पाटील, ऋषिकेश कुलकर्णी, वरिष्ठ सहाय्यक भारत कांबळे, समीक्षा वळवडे, डाटा एन्ट्री ऑपरेटर स्वप्नील काशीद यांच्यासह ग्रामपंचायतीकडील अधिकारी, लिपिक व कर्मचारी उपस्थित होते.



मिरज तालुक्यातील लाभार्थ्यांना घरकुलांची मंजूर पत्रे गटविकास अधिकारी ज्ञानदेव मडके यांच्या हस्ते देण्यात आली.

# घरकुलांचे बांधकाम रखडल्यास कारवाई

मिरज पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांचा इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

मालगाव : मिरज तालुक्यातील अनुदान मिळालेल्या लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांची बांधकामे तातडीने पूर्ण करावीत, निधीचा गैरवापर होऊन बांधकाम रखडल्यास संबंधित लाभार्थ्यांवर कारवाई करण्याचा इशारा मिरज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्ञानदेव मडके यांनी दिला.

मिरज तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत टप्पा क्रमांक २ मधील एकूण १७५ मंजूर घरकुले, रमाई आवासची २७, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेची ६७ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर १८ या योजनांची घरकुले सुरू करण्यासाठी ५८ गावच्या लाभार्थ्यांची चार टप्प्यांत बैठक गटविकास अधिकारी ज्ञानदेव मडके यांच्या मार्गदर्शनाखाली मिरज पंचायत समितीत घेण्यात आली. यावेळी संबंधीत योजनाचे लाभार्थी व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी घरकुलाचे अनुदान, तसेच इतर योजनेंतर्गत मिळणाऱ्या लाभांबाबतची माहिती देण्यात आली. यावेळी पंचायत समिती आवारातील डेमो हाऊसप्रमाणे घरकुल सुरू करण्यासाठी लाभार्थ्यांना आवाहन करण्यात आले. मिळणाऱ्या अनुदानातून घरकुले तातडीने सुरू करावीत, अनुदानाचा गैरवापर होऊन घरकुलांचे बांधकाम रखडल्यास संबंधित लाभार्थ्यांवर कारवाई करण्याचा इशारा गटविकास अधिकारी ज्ञानदेव मडके यांनी दिला.

यावेळी विस्तार अधिकारी संतोष इंगळे, श्रद्धा पवार, रमणी कांबळे, अभियंता ऋषभ पाटील, ऋषिकेश कुलकर्णी, वरिष्ठ सहायक भारत कांबळे, समीक्षा वळवडे, स्वप्निल काशीद आदींसह ग्रामपंचायत अधिकारी, लिपिक व इतर विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

लोकार्पण ● आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नांना आले यश; १२ घरकुले पूर्ण

# तेलवडे आदिवासी वाडीला घराच्या चाव्या

मुरुड जंजिरा, (वा.) अलिबाग मुरुड विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने तेलवडे टक्का आदिवासी वाडी येथे जनमन व आदिम योजनेतून ३४ घरकुले मंजूर झाली होती. त्यापैकी १२ घरकुले पूर्ण झाल्याने त्या घराच्या चाव्या आदिवासी लोकांना लोकार्पण करण्यात आले. या विशेष कार्यक्रमासाठी शिवसेना शिंदे गटाचे नेते विघ्नेश माळी हे आवर्जून उपस्थित होते. विघ्नेश माळी यांच्या हस्ते १२ घरकुलाच्या चाव्या आदिवासी लोकांना वाटप करण्यात आल्या. यावेळी तयार घराच्या चाव्या मिळाल्याने आदिवासी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. झोपडीत राहणाऱ्या आदिवासी समाजाला स्वतःचे घर मिळाले आहे. सदरील कार्यक्रमासाठी मुरुड तालुका संघटक दिनेश मिनमिणे, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाई सुर्वे, उपसरपंच निलेश तांबटकर, शिवसेनेचे युवा नेते दीपेश वरणकर, मुरुड तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, शिवसेना कार्यकर्ते चंद्रकांत झोरे, तेलवडे सरपंच कल्पना पवार, रवी वाघमारे, राजेश वाघमारे, रूपाली वाघमारे, अविनाश शिंदे व सर्व ग्रामस्थ आदिवासी बांधव उपस्थित होते.



### हक्काची घरे मिळण्यासाठी आमदार सदैव प्रयत्नशील

शिंदे शिवसेना गटाचे नेते विघ्नेश माळी यांनी सांगितले की, आमदार महेंद्र दळवी यांनी सर्वात मोठा निधी मुरुड तालुक्यात देऊन मोठा विकास साधला आहे. मुरुड तालुक्याच्या विकासाबरोबरच आदिवासी समाजाला हक्काची घरे मिळण्यासाठी आमदार सदैव प्रयत्नशील राहून तेलवडे टक्का आदिवासी वाडीमधील लोकांना हक्काची घरे मिळण्यासाठी ३४ घरकुले मंजूर केली आहेत. ज्याप्रमाणे आता १२ लोकांना घराच्या चाव्या दिल्या आहेत. त्याप्रमाणे उर्वरित लोकांना सुद्धा चाव्या देण्यात येणार आहेत. ही घरे लवकरात लवकर पूर्ण करा, असा आदेश सुद्धा यावेळी त्यांनी दिला. यावेळी मुरुड तालुका संघटक दिनेश मिनमिणे यांनी सांगितले की, स्थानिक आमदार जागृत असल्यानेच आदिवासी लोकांना हक्काची घरे मिळाली आहेत. यापुढे सुद्धा आदिवासी लोकांच्या विकासासाठी आमदार नेहमीच प्रयत्नशील राहतील, अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

# मुदखेड तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १२३१ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर

गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी दिली माहिती

मुदखेड (वार्ताहर)-मुदखेड तालुक्यातील ग्रामीण भागासाठी पंचायत समिती अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत २०२४ ते २५ सर्व ग्रामपंचायतचे १३३१ उद्दिष्ट मिळाले असून त्यापैकी १२ ३१ प्रधानमंत्री आवास योजना घरकुल मंजुरी देण्यात आली असून ७७१ लाभार्थ्यांच्या प्राणांली. द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये पंधरा हजाराचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला असून.

अशी माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी माध्यम प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.तसेच शिल्लक लाभार्थ्यांनी कागदपत्रे घेऊन पंचायत समितीला दाखल करावे.त्यांच्या बँक खात्यात .वितरीत करण्यात येईल.

ज्या लाभार्थ्यांना पहिला हप्ता.मिळाला त्यांना घरकुल बांधकाम परवानगी देण्यात आली असून सर्वांनी तात्काळ बांधकामाला सुरुवात करावी.

मुदखेड तालुक्यात एकूण ५० ग्रामपंचायती असून तालुक्यात सर्वात जास्त प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मोठ्या प्रमाणात १२ ३१ मंजूर झाले असून ७७१ घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता ग्रामीण दुसरा टप्पा अंतर्गत मिळाला आहे तरी घरकुल लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम तात्काळ सुरू कराअसे आवाहन मुदखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी केले आहे.




मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १०० दिवसाच्या विशेष कार्यक्रमांतर्गत ग्रामविकास विभागातील सर्व योजनांच्या आढावा बैठकी प्रसंगी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे उपस्थित



मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १०० दिवसाच्या विशेष कार्यक्रमांतर्गत ग्रामविकास विभागातील सर्व योजनांच्या आढावा बैठकी प्रसंगी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. जयकुमार गोरे यांच्यासह उपस्थित मान्यवर



मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास विभागांतर्गत विविध योजनांच्या आढावा बैठकी प्रसंगी उपस्थित अधिकारी



मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम विकास विभागांतर्गत विविध योजनांच्या आढावा बैठकी प्रसंगी सादरीकरण करतांना मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले

**“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,**
**राज्यातील सर्वांसाठी आवास”**




**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
Email ID : directoriayruralhousing@gmail.com
दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४